दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
वैभव विवेक स्वामी
सपादक
SAMARTH RAJYOG
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –३४७ मंगळवार दि.२५ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-347 Tuesday, Dt.25 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बीडच्या आरोग्य व्यवस्थेला ‘ऑपरेशन’ची गरज.!

## माता–बाल रुग्णालयातील कथित हलगर्जीपणाने व्यवस्थेचे धिंडवडे, पोटात गॉज राहिल्याच्या प्रकरणाने शस्त्रक्रिया सुरक्षेवर गंभीर प्रश्न ?

### मृत्यू, गुंतागुंत अन् तक्रारींची मालिका, जबाबदार कोण ? प्रशासनाच्या देखरेखीवरही संशयाची सुई

बीड प्रतिनिधी

गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांच्या उपचारासाठी कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या बीड जिल्हा रुग्णालयातील माता–बाल रुग्णालयाची आरोग्यव्यवस्था पुन्हा एकदा सवालांच्या भोवऱ्यात सापडली आहे. प्रसूतीदरम्यान महिलांच्या मृत्यूच्या घटना आणि सीझेरियन शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या पोटात गॉज/स्पंज राहिल्याच्या गंभीर आरोपामुळे शस्त्रक्रिया सुरक्षिततेच्या संपूर्ण यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, अशा प्रकरणात केवळ शस्त्रक्रिया करणाऱ्या एका डॉक्टरची जबाबदारी निश्चित करून भागणार नाही. शस्त्रक्रिया पथकातील डॉक्टर, भूलतज्ज्ञ, परिचारिका, ऑपरेशन थिएटर कर्मचारी, वापरलेल्या साहित्याची मोजणी करणारे कर्मचारी आणि त्यावर देखरेख ठेवणारे प्रशासन यांची भूमिका तपासण्याची मागणी होत आहे.

‘शस्त्रक्रिया सुरक्षितता तपासणी यादी’ प्रत्यक्ष वापरली जाते का ?

शस्त्रक्रियेपूर्वी व शस्त्रक्रियेनंतर गॉज, स्पंज, सुई आणि उपकरणांची मोजणी केली जाते का? अंतिम मोजणीची नोंद कुठे आहे ? संबंधित डॉक्टरांना ती माहिती दिली जाते का ? ऑपरेशन थिएटरमधील सुरक्षा प्रक्रिया प्रत्यक्षात पाळली जाते की केवळ कागदोपत्री सोपस्कार उरकले जातात? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.दरम्यान, जिल्हा रुग्णालयातील कथित हलगर्जीपणाविरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी आंदोलन छेडले आहे. तर डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी केवळ डॉक्टर नव्हे, तर संपूर्ण ऑपरेशन पथक आणि जिल्हा शल्यचिकित्सकांच्या प्रशासकीय देखरेखीची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आरोग्यसेवा ही जीव वाचवण्यासाठी असते, निष्काळजीपणामुळे जीव धोक्यात घालण्यासाठी नव्हे.! आता प्रशासनाने कागदावरील अहवालांपेक्षा प्रत्यक्ष रुग्णालयातील व्यवस्था तपासण्याची वेळ आली आहे.

#### बीडच्या आरोग्य व्यवस्थेचा ‘तिसरा डोळा’ कुठे ?

रुग्णालयातील सुविधा, डॉक्टरांची उपलब्धता, ऑपरेशन थिएटरमधील सुरक्षा व्यवस्था आणि रुग्णांच्या तक्रारी यांची नियमित प्रशासकीय तपासणी होत असेल, तर गंभीर घटना वारंवार का समोर येत आहेत? जबाबदारी निश्चित होणार की चौकशी समित्यांच्या फेऱ्यात प्रकरणे पुन्हा गाडली जाणार ? हा खरा प्रश्न आहे.

बीडच्या नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित आरोग्यसेवा मिळणे हा अधिकार आहे. त्यामुळे प्रत्येक घटनेची निष्पक्ष चौकशी, दोषींची जबाबदारी निश्चिती आणि शस्त्रक्रिया सुरक्षा व्यवस्थेचे स्वतंत्र लेखापरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे.




# बीड जिल्हा उपाध्यक्ष रा.काँ.प.चे गणेश देवकते यांनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन



#### शेतकरी राजाला सुखी करण्यासाठी केली प्रार्थना

परळी वैजनाथ प्रतिनिधी

कारुण्य सिन्धु भव दु:खहारी, तुजवीण शंभो मजकोण तारी दुसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त प्रभू वैद्यनाथाचे जिल्हा उपाध्यक्ष बीड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गणेश देवकते यांनी दर्शन घेतले.सध्या पाऊस लांबल्यामुळे बळीराजा चिंतेत आहे. शेतात पीकं माना टाकू लागली आहेत. वैद्यनाथाच्या चरणी एकच मागणं मागितलं – हे महादेवा, बळीराजावर कृपा कर, भरपूर पाऊस पाड आणि



शेतकऱ्याच्या जीवनात सुगीचे दिवस येऊ दे. बळीराजाला सुखी कर, भरपूर पाऊस पडू दे अशी प्रार्थना केली.

हर हर महादेवचा जयघोष करत परळी वैद्यनाथ येथील श्री प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी आलेल्या

पान २ वर...

# म्हैस चोराच्या मुसक्या आवळल्या, दुचाकीसह ७० हजारांचा मुद्देमाल जप्त.!

#### स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, तीन चोरीचे गुन्हे उघडकीस

बीड प्रतिनिधी

म्हैस चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास करताना स्थानिक गुन्हे शाखा, बीड पथकाने एका सराईत चोरट्याच्या मुसक्या आवळल्या. मुंजा भगवान मोरे (वय २६, रा. कारी, ता. धारूर, जि. बीड) याला मोटारसायकलसह ताब्यात घेत चौकशी केली असता त्याच्याकडून सिरसाळा, केज आणि परंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी त्याच्याकडून ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सिरसाळा पोलीस ठाण्यात गुरनं. २४४/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये दाखल असलेल्या म्हैस चोरीच्या गुन्ह्याचा तपास सिरसाळा पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. २३ ऑगस्ट रोजी पोउपनि महेश विघ्ने यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने म्हातारगाव येथे सापळा रचून मुंजा मोरे याला दुचाकीसह ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपीने सिरसाळा येथील म्हैस

पान २ वर...



# बालकांच्या ताटात आळ्या अंबड तालुका हादरला..!

## प्रशासनाच्या भोंगळ कारभारावर नागरिकांचा तीव्र संताप



#### जामखेड येथील संतापजनक प्रकारानंतर संपूर्ण तालुक्यातील अंगणवाड्यांच्या धाडसत्राची जोरदार मागणी

अंबड प्रतिनिधी

चिमुकल्यांच्या तोंडातील घास हिसकावून घेणारा आणि त्यांच्या आरोग्याशी थेट खेळणारा एक धक्कादायक अन् तितकाच संतापजनक प्रकार अंबड तालुक्यातील जामखेड येथे समोर आला आहे. येथील अंगणवाडीत बालकांना देण्यात आलेल्या शिजवलेल्या शिऱ्यामध्ये थेट आळ्या आढळल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

या गंभीर घटनेनंतर पालकांसह सर्वसामान्य नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त होत असून केवळ एका अंगणवाडीवर थातूरमातूर कारवाई न करता अंबड तालुक्यातील सर्व अंगणवाड्यांची तातडीने चौकशी करा अशी आक्रमक मागणी आता जोर धरू लागली आहे.कागदी कारभार अन् प्रत्यक्ष आळ्या सुपरवायझर करतात तरी काय? शासनाकडून बालकांचा कुपोषणमुक्त विकास व्हावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो.मात्र प्रत्यक्षात बालकांच्या ताटात आळ्यायुक्त आहार दिला जात असेल तर संबंधित यंत्रणा झोपली आहे का? असा रोखठोक सवाल नागरिक विचारत आहेत.या संपूर्ण प्रकरणात संबंधित सुपरवायझर पर्यवेक्षिका यांच्या भूमिकेवरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सुपरवायझर यांनी आजवर आपल्या क्षेत्रातील अंगणवाड्यांना खरोखरच भेटी दिल्या आहेत की केवळ टेबल रिपोर्टिंग करून कागदी घोडे नाचवले भेटीदरम्यान आहाराची गुणवत्ता स्वच्छता आणि

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दै. समर्थ राजयोग
राजमान्य–राजशक्ती
05 सप्टेंबर
७ वा वर्धापन दिन विशेषांक–२०२६

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती ________

स.न.वि.वि.
मागील ६ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील ‘दै.समर्थ राजयोग’ चा ७ वा वर्धापन दिन शनिवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही ‘वर्धापन दिन विशेषांक २०२६’ चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

वर्धापन दिन जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/– |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/– |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/– |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/– |

दिनदर्शिका–२०२७ जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १२ पेज | पूर्ण पट्टी | ३०,०००/– |
| २. | ६ पेज | पुर्ण पट्टी | २०,०००/– |
| ३. | १२ पेज | उभी पट्टी | ३०,०००/– |
| ४. | शुभेच्छा | पॅनल | २,०००/– |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड
महोदय,
वर्धापन दिन विशेषांक २०२६ किंवा दिनदर्शिका २०२७ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................/- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............./- रोख/चेक/डी.डी./ऑनलाईन जमा करत आहे.
जाहिरातदाराचे नाव : ________
गाव : ________ तालुका : ________ जिल्हा : ________
मो.नं. : ........
₹5000/– ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!
जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :–
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : vaibhav11swami@gmail.com

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
vaibhav swami
Bank Of Maharashtra 3712
UPI ID: vaibhav11swami@okhdfcbank
Scan this code to pay me
गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
बँके खाते :
दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

७ व्या वर्धापन दिनानिमित्त
दै. समर्थ राजयोग
राजमान्य–राजशक्ती
गौरव समर्पणाचा ! सन्मान ज्ञानदानाचा !!
आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६
सहभागाकरीता नम्र आवाहन
प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख
गुरुवार, २० ऑगस्ट २०२६

शिक्षण क्षेत्रातील समर्पण, अमूल्य योगदान आणि विशेष शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी 'दैनिक समर्थ राजयोग' च्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील गुणवंत व उपक्रमशील शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.यावर्षी विशेष प्राधान्याने दिव्यांग शाळांमधील शिक्षक/कर्मचारी व दिव्यांग संस्थाचालक यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली जाणार आहे. तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील आपल्या विशेष कर्तृत्वाने आदर्शाचा वस्तुपाठ घालणाऱ्या शिक्षकांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. तरी आपण आपल्या विशेष व कौतुकास्पद कामाचा संक्षिप्त अहवाल (पुराव्यांसह/छायाचित्रांसह) पाठवावा ही विनंती.

वैभव जगदेवी विवेक स्वामी
- संपादक




पुरस्कारासाठी पात्र निकष व वर्गवारी

1. दिव्यांग शाळा व संस्था :
दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.
दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्य करणारे संस्थाचालक.
निकष:
दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी, शिक्षणासाठी व आत्मविश्वासासाठी केलेले विशेष व कौतुकास्पद कार्य.

2. सामान्य शाळा वर्गवारी:
जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील शिक्षक.
निकष:
गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमशीलता, सामाजिक सहभाग आणि उत्कृष्ट कार्यकाळ.

प्रस्तावासोबत जोडायची माहिती:
पूर्ण नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक, सध्या कार्यरत असलेली संस्था/शाळा व पद, शैक्षणिक कार्यकाळात केलेले कार्य.

आपले प्रस्ताव पाठवण्यासाठी: ईमेल: vaibhav11swami@gmail.com व्हॉट्सॲप / संपर्क: 9822628521
कार्यालयाचा पत्ता: दैनिक समर्थ राजयोग कार्यालय, सम्राट चौक, शाहुनगर कॉर्नर, बीड - ४३११२२

## संपादकीय....

# संस्कृती आणि रक्षक

सिंहगडावर बर्म्युडा परिधान करून आलेल्या एका लहान मुलीच्या वडिलांना काही तथाकथित संस्कृती रक्षकांनी मारहाण केल्याचा विषय सध्या गाजत आहे. या विषयावर उलट सुलट चर्चा होत असतानाच सांगली जिल्ह्यातील ३२ शिराळा येथे नागपंचमी यात्रेदिवशी नागराजांच्या मिरवणुकीमध्ये महिलारूपी नागिणींनी जो बिभत्स नाच केला होता त्याची चर्चाही रंगू लागली आहे.

सांगली जिल्हा प्रशासनाने याची दखल घेऊन संबंधित नागराज मंडळांवर जरी कारवाई केली असली, तरी या निमित्ताने संस्कृती आणि संस्कृती (उींश्रींीीश) रक्षकांची मानसिकता निश्चितच समोर येताना दिसत आहे. लवकरच दहीहंडीसारखा एक मोठा उत्सव होणार आहे. त्यानंतर गणेशोत्सव साजरा केला जाईल. महाराष्ट्रीय संस्कृतीचे प्रातिनिधिक रूप असलेल्या या उत्सवांनी गेल्या काही वर्षांमध्ये घेतलेले जे रूप आहे ते पाहता या दोन्ही उत्सवांमध्येही ते तथाकथित संस्कृती रक्षक आपली भूमिका पार पाडणार आहेत का, याबाबत मात्र उत्सुकता आहे.

कारण दहीहंडी उत्सव असो किंवा गणेशाचे आगमन आणि विसर्जन सोहळा असो, त्यावेळी ज्या मिरवणुका निघतात त्यालासुद्धा आता वेगळे वळण लागले आहे. कोणताही दहीहंडी उत्सव एखाद्या सेलिब्रिटी कलावंताच्या विशेषतः महिला कलावंताच्या उपस्थितीशिवाय पार पडत नाही. दहीहंडी कार्यक्रमाला लोकांची गर्दी व्हावी म्हणून अनेक वेळा नृत्य करणार्या महिलांनाही पाचारण केले जाते. असाच प्रकार गणेशोत्सवातही पाहायला मिळतो.

एकीकडे महाराष्ट्राची संस्कृती असलेली लेझीम, ढोल ही पारंपरिक वाद्य बाजूला पडून आवाजाची अवाढव्य भिंत उभी करून लोक बहिरे होतील अशा प्रकारे जी एक यंत्रणा वापरली जाते त्याबाबत बोलण्यासाठी संस्कृती रक्षक तयार नाहीत हा विरोधाभासही लक्षात घ्यायला हवा. सुप्रीम कोर्टाने किंवा इतर कोणत्याही यंत्रणेने कितीही आदेश दिले तरी गणेश मिरवणूक किंवा दहीहंडीसारख्या उत्सवामधील डीजे आणि डॉल्बीचा दणदणाट कमी होत नाही.

एखादा उत्सव यशस्वी झाला याचे मापदंड म्हणून ह्या भीषण आवाजाकडे आणि इतर गैरप्रकारांकडे जर पाहिले जात असेल, तर या उत्सवातील खर्या संस्कृतीचा सर्वांनाच विसर पडला आहे, असे म्हणावे लागते. बहिरेपणाला आणि हृदयविकाराला कारणीभूत ठरणार्या या आवाजाच्या ठणठणाटाला अनेक वेळा स्थानिक राजकीय पुढारी यांचाच आशीर्वाद लाभलेला असतो हेसुद्धा लक्षात घ्यावे लागते.गणेशोत्सवपूर्व गणेश मंडळांच्या बैठका ज्या झाल्या त्या बैठकांमध्ये अनेक शहरांमध्ये गणेश मंडळांनी डॉल्बी आणि डीजे वाजवण्याची परवानगी देण्याची मागणी केली हे विशेष आहे. एकीकडे ज्येष्ठ नागरिक संघटना असो किंवा डॉक्टरांच्या संघटना असो किंवा काही एनजीओ असोत आवाज प्रदूषण कमी करण्यासाठी डीजे आणि डॉल्बीसारख्या आवाजाच्या यंत्रणा वापरू नयेत

पान १ वरुन..

**म्हैस चोराच्या ....**

चोरीची कबुली दिली. अधिक तपासात त्याने केज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केवड गावातून म्हैस चोरी केल्याचे तसेच त्याच्या ताब्यातील मोटारसायकल परंडा येथून चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

या कारवाईत सिरसाळा गुरनं. २४४/२०२६, केज गुरनं. ५०९/२०२६ आणि परंडा गुरनं. ३५०/२०२६ असे तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीला पुढील तपासासाठी सिरसाळा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि महेश विघ्ने, पोहवा बप्पासाहेब घोडके, पोहवा महेश जोगदंड, पोहवा जफर पठाण आणि चापोहवा गणेश मराडे यांनी केली.

**बीड जिल्हा उपाध्यक्ष....**

भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण झाले आहे.दि.२४ ऑगस्ट रोजी दुसऱ्या श्रावणी सोमवारच्या निमित्ताने बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची रीघ लागली आहे. राज्यातूनच नव्हे तर देशभरातून भाविक वैद्यनाथाच्या दर्शनासाठी दाखल झाले होते.

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी देशाच्या विविध भागातून लाखोंच्या संख्येने भाविक येतात, आजही मध्यरात्री पासून मंदिरात दर्शनासाठी मोठी रांग लागली होती.जिल्हा उपाध्यक्ष बीड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गणेश देवकते यांनी वैद्यनाथाचे दर्शन घेतले. यावेळी मराठा सेवक नितीन सोळंके उपस्थित होते. जिल्ह्यावरील दुष्काळाचे सावट पडले आहेत. पिके करपू लागले आहेत. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वरूनराजची कृपादृष्टी होण्यासाठी गणेश देवकते यांनी प्रार्थना केली.

**बालकांच्या ताटात....**

साठवणुकीची पाहणी केली होती का ? या सर्व कागदपत्रांची निष्पक्ष चौकशी करून सुपरवायझरचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्याची जोरदार मागणी होत आहे.सर्व अंगणवाड्यांची अचानक तपासणी करा

जामखेडमधील प्रकरण हे हिमनगाचे केवळ एक टोक असू शकते.त्यामुळे प्रकल्प अधिकारी बाल विकास सेवा योजना अंबड यांनी तातडीने पथके गठीत करून तालुक्यातील एकाही अंगणवाडीला पूर्वसूचना न देता अचानक तपासणी सत्र सुरू करावे अशी ठाम मागणी नागरिकांनी केली आहे.

तपासणी दरम्यान प्रामुख्याने खालील बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची मागणी होत आहे.अन्नधान्य साठा व गुणवत्ता पुरवठा झालेला आहार त्याची मुदत पॅकिंग साठवणूक आणि अन्न शिजवण्याच्या जागेची स्वच्छता. रजिस्टर व दस्तऐवज तपासणी बालकांची नोंदणी विरुद्ध प्रत्यक्ष उपस्थिती नोंदवही पोषण आहार साठा नोंदवही वजन व वाढीचे पत्ते आणि आरोग्यविषयक नोंदी.

वेळ व उपस्थिती अंगणवाडी सुरू आणि बंद होण्याच्या निश्चित वेळा तसेच सेविका व मदतनिस

पान १ वरुन..

यांची प्रत्यक्ष उपस्थिती.नमुने प्रयोगशाळेत पाठवा संशयित अन्नधान्य व शिजवलेल्या आहाराचे नमुने तात्काळ सक्षम प्रयोगशाळेत पाठवून त्याची गुणवत्ता तपासावी. दोषींवर कारवाई करा पण निष्पापांना बळी देऊ नका हा विषय चिमुकल्यांच्या आरोग्याशी आणि भवितव्याशी निगडित असल्याने यावर कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही.मात्र केवळ राजकीय किंवा सामाजिक दबावाखाली येऊन कोणत्याही सेविका मदतनीस किंवा कर्मचाऱ्याला पुराव्याशिवाय दोषी ठरवू नये. अन्नधान्य पुरवठादारापासून ते वितरकापर्यंत आणि साठवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांपासून ते स्थानिक कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांची सखोल चौकशी व्हावी.

चौकशीअंती आहाराच्या गुणवत्तेत त्रुटी साठवणुकीत हलगर्जीपणा किंवा नोंदींमध्ये तफावत आढळल्यास दोषींवर शासनाच्या कठोर नियमांनुसार थेट गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी.

अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी

अंबड तालुक्यातील या गंभीर प्रकारावर पडदा टाळण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. जामखेडसह संपूर्ण तालुक्यातील सर्व अंगणवाड्यांच्या तपासणीचा अधिकृत व पारदर्शक अहवाल प्रशासनाने जाहीर करावा आणि जनतेसमोर खरी वस्तुस्थिती आणावी अशी एकमुखी मागणी आता अंबड तालुक्यातून होत आहे.

# मराठीवरील प्रभुत्व, निस्सीम प्रेमाचा उत्तुंग आदर्श

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रा. यास्मिन शेख यांना भावपूर्ण श्रद्धांजली

मुंबई /प्रतिनिधी

मराठी भाषेवरील प्रभुत्व आणि निस्सीम प्रेमातून भाषाशास्त्रात उत्तुंग आदर्श निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ व भाषाशास्त्राच्या अभ्यासक प्रा. यास्मिन शेख यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

प्रा. शेख यांनी शिक्षिका, लेखिका आणि संशोधक म्हणून आयुष्यभर मराठी भाषेची सेवा केली. मराठी व्याकरणावर त्यांनी प्रदीर्घ संशोधन केले तसेच अन्य भारतीय भाषांचाही अभ्यास केला. भाषेचे सौंदर्य, शब्दांचा अचूक वापर आणि व्याकरण सहजसोप्या पद्धतीने समजावून सांगण्याची त्यांची शैली विशेष लोकप्रिय होती.

त्यांचे लेखन व संशोधन मराठी भाषेसाठी अमूल्य ठेवा असून, त्यांच्या निधनाने मराठी साहित्य व भाषाशास्त्र क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. प्रा. यास्मिन शेख यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात नमूद केले.

# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६

### अधिकाधिक मंडळांनी सहभागी व्हावे
### अर्जाची अंतिम मुदत ७ सप्टेंबर

रायगड-अलिबाग (जि. मा. का.)

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे. यंदा स्पर्धेचा विस्तार राज्यासह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आला असून मंडळांना विविध स्तरांवर पारितोषिके जिंकण्याची संधी आहे.

स्पर्धा राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर होणार असून नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना विनामूल्य सहभागी होता येणार आहे. अर्ज ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन भरता येतील.

स्पर्धेतील विजेत्या मंडळांना जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने गौरविण्यात येणार आहे. तसेच पोर्टलवर घरगुती व सार्वजनिक गणपतींचे छायाचित्र विनामूल्य प्रसिद्ध करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

जिल्ह्यातील अधिकाधिक मंडळांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सूर्यवंशी यांनी केले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बीडच्या पदक विजेत्या खेळाडूंचा भव्य सत्कार

## २७ ऑगस्टपर्यंत नोंदणीचे आवाहन, २८ ते ३० ऑगस्ट दरम्यान विविध उपक्रम

बीड /प्रतिनिधी

महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीडच्या वतीने २८ ते ३० ऑगस्टदरम्यान विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुलात 'डिजिटल ट्रिब्यूट', '२९ चॅलेंज', 'पास द बॉल' व 'स्पोर्ट्स बंधन' हे उपक्रम होतील. २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता राजर्षी शाहू कन्या विद्यालय, बार्शी रोड येथे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ पदकविजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार आहे. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता चहाटा फाटा, नगर रोड येथे 'संडेज ऑन सायकल' व 'रन अँड राइड' स्पर्धा घेण्यात येतील.सन २०२५-२६ मध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पात्र खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते गौरव केला जाणार आहे. पात्र खेळाडूंनी २७ ऑगस्ट २०२६ पर्यंत अर्ज व प्राविण्य प्रमाणपत्रासह नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या पात्र खेळाडूंचाच सत्कार करण्यात येणार आहे.

प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, क्रीडा संघटना व पदाधिकाऱ्यांनी पात्र खेळाडूंची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी तथा कार्यासन प्रमुख अनिकेत काळे (९६०४९५९६७८) यांच्याशी संपर्क साधावा.हे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.




### कोल्हापूरच्या कर्तृत्वाचा सन्मान, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांचा गौरव

कोल्हापूर : 'महास्ट्राईड' अंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील जिल्हा विकास आराखड्याच्या अंमलबजावणीत १०० टक्के गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल 'कोल्हापूर फर्स्ट'च्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांचा शाल व विशेष गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कोल्हापूर फर्स्टचे अध्यक्ष सुरेंद्र जैन, कमलाकांत कुलकर्णी, जयदीप चौगले, भरत जाधव, रणजीत जाधव, बदाम पाटील, सचिन शानबाग, बळीराम वराडे, जयदीप पाटील, सचिन मेनन, जितूभाई शाह आदी उपस्थित होते.

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/१९३**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- १३/०३/२०२६**

### जाहिरनामा

अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- शेख आखेब शफिक
प्रकरण :- सिटी सर्व्हे नं. १३३३ न.प.घर नं.१२-४८/२/१ व १२-४८/२/२ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१२-४८/२/१ व १२-४८/२/२ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला ---------------------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा,नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चतु:सिमा:**
पुर्व :- आसेफा सय्यद जाकेर यांचे घर
पश्चिम :- रस्ता व शाहेद मुजाहेद सय्यद व किश्वर फातेमा सय्यद मोहियोद्दीन यांचे घर
दक्षिण :- सय्यद शाकेर चुन्नुमिया यांचे घर
उत्तर :- रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

### टी.सी. हरवला आहे...

धारूर-तेलगाव बस प्रवासात अंजली लक्ष्मण चोले यांचा टी.सी. हरवला आहे धारूर ते तेलगाव बसने प्रवास करत असताना अंजली लक्ष्मण चोले यांचा टी.सी.हरवला आहे प्रवासा दरम्यान.

सदर कागदपत्र कोणाला सापडल्यास कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधून तो परत करावा, अशी विनंती आहे.

**संपर्क : ७६६६८९६२१४**
**टी सी सापडल्यास वरील क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा.**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४६/२०२६**
**आकाश पि. जयराम निकम वि. निरंक**
**मार्फत - ॲड वाय. एच. पाटील, गेवराई**

अर्जदार
१. आकाश पि. जयराम निकम वय ३१ वर्षे, धंदा - शेती
रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड
२. आशाबाई ब्र. जयराम निकम
वय ५३ वर्षे, धंदा - शेती
रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड
३. श्रीमती कल्याणी ब्र. सुधीर पवार
वय २९ वर्षे, धंदा - शेती रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड
४. सौ. गिता भ्र. अक्षय स्वामी वय २७ वर्षे, धंदा - शेती रा. शिरुर का. ता. शिरुर का. जि. बीड

ज्याअर्थी मयत जयराम संतराम निकम हे/हया अनुक्रमे दिनांक ०१/०५/२०२६ रोजी मादळमोही ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत जयराम संतराम निकम, रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०३/१०/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड**
**यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४५/२०२६**
**शशिकला भ्र. निवृत्ती थोरात व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. आर. एल. गवारे)**

ज्याअर्थी मयत नामे निवृत्ती रंगनाथ थोरात, रा. तरटेवाडी ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक २१/०५/२०२६ रोजी तरटेवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ शशिकला भ्र. निवृत्ती थोरात, वय ९० वर्षे, धंदा घरकाम, रा. तरटेवाडी पो. सिरसमार्ग ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ मधुकर पि निवृत्ती थोरात, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, अर्जदार क्र. ३ भगवान पि. निवृत्ती थोरात, वय ५६ वर्षे, धंदा शेती व शिक्षण, रा. सदर, अर्जदार क्र. ४ नानासाहेब पि. निवृत्ती थोरात, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. सदर, अर्जदार क्र. ५ जनाबाई भ्र. महादेव गव्हाणे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. पारगाव सिरस ता. जि.बीड, अर्जदार क्र. ६ सतीभामा भ्र. आत्माराम मस्के, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. घाटसांगवी ता. जि.बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत निवृत्ती रंगनाथ थोरात यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १४/१०/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२३२७/२०२६**
**शेख नसीम जैनद्दीन** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय पाली**

पहा.

**१. शेख नसीम जैनुद्दीन, रा.पाली ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख नसीम जैनुद्दीन** यांचा **दिनांक ०१.१०.१९८४** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृतयू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जनमाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पाली** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबील दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मौजे पाली ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०७.०८.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख ०७.०९.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२३२९/२०२६**
**शेख रजियोद्दीन जैनद्दीन** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय पाली**

पहा.

**१. शेख रजियोद्दीन जैनद्दीन, रा.पाली ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख रजियोद्दीन जैनद्दीन** यांचा **दिनांक २१.०२.१९८३** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जनमाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पाली** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबील दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मौजे पाली ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०७.०८.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख ०७.०९.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२३२८/२०२६**
**शेख रशीदा शेख गुलाब** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय पाली**

पहा.

**१. शेख रशीदा शेख गुलाब, रा.पाली ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख रशीदा शेख गुलाब**यांचा **दिनांक २०.०१.१९५८** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जनमाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पाली** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबील दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मौजे पाली ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०७.०८.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख ०७.०९.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२३२६/२०२६**
**शेख यास्मीन शेख आझाद** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय पाली**

पहा.

**१. शेख यास्मीन शेख आझाद, रा.पाली ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख यास्मीन शेख आझाद**यांचा **दिनांक १४.०७.१९९२** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जनमाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पाली** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबील दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मौजे पाली ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०७.०८.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख ०७.०९.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

# जालना जिल्ह्यावर दुष्काळाचे संकट सरकार अजूनही झोपेत

## पावसाच्या खंडाने खरीप करपण्याच्या मार्गावर, खा.डॉ. कल्याण काळे यांचा प्रशासनाला इशारा

जालना / शेख फारुक

आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली आहे. पावसाने लांबलेली दडी आणि त्यानंतर पडलेला दीर्घ खंड यामुळे खरीप हंगाम संकटात सापडला आहे. शेतात पिके हिरवीगार दिसत असली तरी जमिनीतील ओलावा संपत चालला असून पिकांची वाढ खुंटली आहे. त्यामुळे दुष्काळाचे संकट दारात येऊन ठेपले असताना प्रशासनाने कागदी घोडे नाचविण्याऐवजी बांधावर उतरावे अशी घणाघाती मागणी जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केली आहे.

सोयाबीन कापूस तूर मूग उडीद मका यांसह खरीप पिकांना पावसाच्या खंडाचा जबर फटका बसला आहे. पिकांचा बाह्य हिरवेपणा पाहून परिस्थिती आलबेल असल्याचे चित्र रंगविण्याचा प्रयत्न झाला तर तो शेतकऱ्यांवर अन्याय ठरेल. पिकांच्या पानांचा रंग पाहू नका जमिनीतील ओलावा आणि शेतकऱ्याच्या डोळ्यातील पाणी पाहा असा सवालच खासदार काळे यांनी प्रशासनाला केला आहे.

ऊस-फळबागाही संकटात शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले पावसाने पाठ फिरवल्याने ऊस पिकाची वाढ खुंटली आहे.फळबागांमध्येही पाण्याअभावी झाडांची वाढ फळधारणा आणि उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच वाढत्या खर्चाने कंबरडे मोडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.

एकीकडे पावसाचा खंड, दुसरीकडे घटलेली जमिनीची आर्द्रता आणि तिसरीकडे उत्पादन घटण्याची टांगती तलवार अशा तिहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. त्यातच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची चिंता डोके वर काढत आहे.

२८ टँकर सुरू तरी प्रशासनाला दुष्काळ दिसत नाही? जिल्ह्यातील १६ गावे आणि १३ वाड्यांना २८ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. तब्बल ३० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. ही आकडेवारीच परिस्थितीची गंभीरता सांगण्यासाठी पुरेशी आहे. मग प्रशासनाला दुष्काळाचे गांभीर्य जाणवण्यासाठी आणखी किती गावांना टँकरची गरज आहे असा सवाल उपस्थित होत आहे.

पाणीटंचाईची परिस्थिती आणखी गंभीर होण्याआधी प्रशासनाने जागे व्हावे. संकट डोक्यावर आल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आताच नियोजन करून पाणी चारा आणि शेतीसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणी खासदार काळे यांनी केली आहे.कागदावरचे पंचनामे नकोत शेताच्या बांधावर या



जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पर्जन्यमान पावसातील खंड जमिनीतील ओलावा पिकांची वाढ आणि प्रत्यक्ष परिस्थितीची वस्तुनिष्ठ पाहणी करावी.खरीप पिकांसोबत ऊस व फळबागांचेही स्वतंत्र पंचनामे करावेत.फक्त शेत हिरवे दिसते म्हणून शेतकरी सुखी आहे असा सरकारी हिशेब चालणार नाही.पावसातील खंड किती होता जमिनीतील ओलावा किती घटला पिकांची वाढ किती खुंटली आणि उत्पादनात किती घट अपेक्षित आहे याचा शास्त्रशुद्ध आढावा घेऊन दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करावे अशी मागणी खासदार काळे यांनी केली आहे. शासनाकडे प्रस्ताव पाठवा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडू नका तालुकानिहाय पीकस्थितीचा अहवाल तातडीने तयार करून शासनाकडे सादर करावा आणि जालना जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी तातडीने प्रस्ताव पाठवावा अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. दुष्काळ जाहीर झाल्यास पीकनुकसान भरपाई पीकविमा पाणी व चारा उपलब्धता कृषी निविष्ठांबाबत मदत तसेच शासनाच्या नियमानुसार इतर सवलती शेतकऱ्यांना तातडीने मिळाव्यात.भविष्यात पावसाची स्थिती आणखी बिघडल्यास पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता यासाठी आतापासूनच कृती आराखडा तयार करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

संकट वाढण्याची वाट पाहणार की शेतकऱ्यांच्या मदतीला धावणार ?

परिस्थिती हाताबाहेर जाण्याची वाट पाहू नका. प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करा वस्तुनिष्ठ अहवाल तयार करा आणि तातडीने निर्णय घ्या. जालना जिल्ह्यातील शेतकरी संकटात असताना प्रशासनाने त्यांना दिलासा देण्यासाठी तत्काळ कार्यवाही करावी असा स्पष्ट इशारा खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिला आहे.शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विरोधक आक्रमक

यावेळी शिवसेना उबाठा जिल्हाध्यक्ष मनिष श्रीवास्तव, काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदर भाई चाऊस,मुरलीधर शेजूळ, प्रभाकर मामा पवार, कृष्णा पा.पडूळ,सुभाष कोळकर, अशोकराव उबाळे, अब्दुल रऊफ, शांतीलाल बनसोडे, दिनेश सुराणा, सय्यद करीम, सोपान तिरुखे, ज्ञानेश्वर डुकरे, ज्ञानदेव इंगोले, गणेशराव खरात, नारायण वाढेकर, गजानन उगले, रघुवीर गुढे, योगेश कदम, शेषराव जाधव, शेख वासिम, शेख जमीर, रज्जाक, योगीताताई धांडगे, संजय बागल, वसीम खान, एस. आर. काळे, बाबा चांगुलपाय, राहुल जयस्वाल, शेख अमीन, दिनेश कावळे, राजू शेळके, कलीम खान, दिग्विजय धांडगे, आरेफ खान यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर जिल्हा गुंतवणूक परिषदेत ३ हजार ६६ कोटींचे ९२ सामंजस्य करार

## ४ हजार १६९ रोजगार निर्मिती; उद्योगांना जलद मंजुरी व पायाभूत सुविधा देण्यास प्रशासन कटिबद्ध

लातूर /प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यात उद्योगांना चालना देण्यासाठी आयोजित जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत ९२ सामंजस्य करार करण्यात आले. या माध्यमातून ३ हजार ६६ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून सुमारे ४ हजार १६९ रोजगार निर्माण होणार आहेत.




उद्योगांना आवश्यक परवानग्या जलदगतीने देण्यासह पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याची ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिली. नवउद्योजकांना मैत्री कक्ष व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

परिषदेला सहायक आयुक्त संजय भुरेवाल, सहायक आयुक्त निखिल पाटील, महावितरणचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, मैत्री कक्षाचे नोडल अधिकारी सागर आवटी, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी धनंजय इंगळे यांच्यासह उद्योजक प्रतिनिधी माजी आमदार गोविंद केंद्रे, सुनील लोहिया आणि श्याम मानधना उपस्थित होते.

लातूरमध्ये अपारंपरिक ऊर्जा, कृषी आधारित, सोयाबीन व डाळ उद्योगांसह विविध क्षेत्रांत गुंतवणूक वाढत आहे. बेलकुंड एमआयडीसी आणि लातूर विस्तारित एमआयडीसीमध्ये नवीन भूखंड उपलब्ध होणार असून, द्रुतगती महामार्गामुळे उद्योगांना आणखी चालना मिळेल, असा विश्वास डॉ. बास्टेवाड यांनी व्यक्त केला.

परिषदेचे प्रास्ताविक निखिल पाटील यांनी केले. सागर आवटी यांनी मैत्री पोर्टल व उद्योगविषयक परवानगी प्रक्रियेची माहिती दिली.

# यशवंतराव चव्हाण धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते..

## ‘भूमिका’तील विचार आजच्या काळातही मार्गदर्शक : ज्येष्ठ राज्यशास्त्रज्ञ डॉ. अशोक चौसाळकर

लातूर प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण हे जातीय व धार्मिक राष्ट्रवादात अडकलेले नेते नसून धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ राज्यशास्त्रज्ञ तथा शिवाजी विद्यापीठाचे माजी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई जिल्हा केंद्र, लातूर आणि यशवंतराव चव्हाण लोकविकास प्रतिष्ठान, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जयक्रांती महाविद्यालयात आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेच्या दुसऱ्या पुष्पात ‘भूमिका-मधील भाषणे : स्वरूप आणि विश्लेषण’ या विषयावर ते बोलत होते.




डॉ. चौसाळकर म्हणाले की, ‘भूमिका’ हा यशवंतराव चव्हाण यांचा तिसरा अधिकृत भाषणसंग्रह असून त्यात भारतीय राष्ट्रवाद, लोकशाही व भाषावाद यावरील त्यांचे सखोल चिंतन आहे. त्यांच्या मते लोकशाही म्हणजे केवळ बहुमताचे राज्य नसून चर्चा व सर्वसंमतीने निर्णय घेण्याची प्रक्रिया आहे. विरोधकांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले होते. त्यामुळे ‘भूमिका’तील विचार आजच्या परिस्थितीत अत्यंत महत्त्वाचे आहेत.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी यशवंतरावांच्या विचारांतील नीतीमूल्ये, सत्ता व आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. स्वार्थासाठी पक्ष बदलणाऱ्यांनी यशवंतरावांची भाषणे वाचावीत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा. गोविंद घार, डॉ. विवेक सौताडेकर, प्राचार्य डॉ. नागनाथराव मोटे, सुनीताताई अरळीकर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. विवेक सौताडेकर, सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय गवई, परिचय प्रा. डॉ. अनिल जायभाये यांनी केला. आभार सुनिता राठोड यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. प्रशांत घार, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, रुक्साना मुल्ला, सायुज्यता खंदारे, ड. वसंतराव उगले, ड. शेखर हविले, ड. इरफान शेख, ड. सुधाकर अरसुडे यांनी परिश्रम घेतले. व्याख्यानास रसिक-श्रोत्यांची मोठी उपस्थिती होती.

# माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक वैभव पाटील व उद्योजक बाळासाहेब कारगुडे यांचा सन्मान

मराठा क्रांती गटाच्या वतीने सत्कार, सामाजिक कार्य व रोजगारनिर्मितीचे कौतुक

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासह अतिक्रमणविरोधी मोहीम प्रभावीपणे राबविल्याबद्दल वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील तसेच हॉटेल व्यवसायातून सुमारे १५० जणांना रोजगार उपलब्ध करून दिल्याबद्दल हॉटेल बळीराजाचे मालक बाळासाहेब कारगुडे यांचा माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या हस्ते मराठा क्रांती गटाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



यावेळी शिवाजीराव पंडित यांनी वैभव पाटील यांच्या कार्याचे कौतुक करत, त्यांच्या प्रयत्नांमुळे शहरातील अनेक रस्ते मोकळे होऊन नागरिकांना दिलासा मिळाल्याचे सांगितले. तसेच बाळासाहेब कारगुडे यांनी व्यवसायासोबत रोजगारनिर्मिती करून अनेक कुटुंबांना आधार दिल्याचे त्यांनी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना वैभव पाटील व बाळासाहेब कारगुडे यांनी आयोजकांचे आभार मानले. ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख यांनीही दोघांच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमास हरिश्चंद्र चव्हाण, रघुनाथ मोहोळकर यांच्यासह मराठा क्रांती गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाजीराव दादांच्या पुढाकारातून गरिबांच्या हृदयाला नवी आशा.!

## हृदय शस्त्रक्रियेसाठी पहिला रुग्ण गट ज्युपिटर हॉस्पिटलकडे रवाना

बीड प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ज्ञानविजय बाजीराव चव्हाण यांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त १५ ऑगस्ट रोजी आयोजित २-डी इको तपासणी व हृदय शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तपासणीत शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांपैकी पहिल्या टप्प्यातील रुग्णांना ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटलकडे उपचारासाठी रवाना करण्यात आले.



शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे आणि युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या संकल्पनेतून हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. आर्थिक परिस्थितीमुळे हृदयावरील उपचारांपासून वंचित राहणाऱ्या गरजू रुग्णांना तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यंत मोफत उपचार उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

शिबिरानंतर अवघ्या सात दिवसांत पहिल्या टप्प्यातील रुग्णांना ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले. रुग्णांना रुग्णालयात नेणे, शस्त्रक्रिया करून पुन्हा घरी पोहोचविण्याची जबाबदारी बाजीराव दादा चव्हाण यांच्या टीमकडून घेतली जात आहे. सर्व शस्त्रक्रिया मोफत होणार असल्याने गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या उपक्रमातून तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यंत गरजूंच्या सोबत हा सेवाभावी संकल्प प्रत्यक्षात उतरला असून नागरिकांकडून बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकाराचे कौतुक होत आहे. पुढील टप्प्यातील रुग्णांनाही आवश्यक उपचारांसाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# एकजुटीने नशामुक्तीचा निर्धार करूया, अमली पदार्थमुक्त सांगली जिल्हा करूया..!

## ‘नशामुक्त सांगली, सुरक्षित सांगली’साठी निर्धार पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

सांगली (जि. मा. का.)

तरुणाईला अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचवून भावी पिढी सुरक्षित ठेवण्यासाठी एकजुटीने नशामुक्तीचा निर्धार करूया व अमली पदार्थमुक्त सांगली जिल्हा करूया, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

‘अमली पदार्थमुक्त सांगली जिल्हा’ अभियानांतर्गत आयोजित नशामुक्ती निर्धार पदयात्रेच्या सांगता कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार विशाल पाटील, आमदार डॉ. सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, महापौर धीरज सूर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, महापालिका आयुक्त संजीता महापात्र, अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर आणि पालकमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव उपस्थित होते.




पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, विटा येथे ३० कोटींचा अमली पदार्थांचा साठा सापडल्यानंतर प्रशासन, प्रतिबंध, प्रबोधन व समुपदेशन या त्रिसूत्रीवर अभियान राबविण्यात आले. गेल्या दीड वर्षात व्यापक जनजागृती करण्यात आली असून ६०० शिक्षक व हजारो विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे धडे देण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचाराची सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे.

निराशा व रिकामेपणातून व्यसन लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांना संगीत, नृत्य, अभिनय व लाठी-काठीचे प्रशिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, त्यासाठी आवश्यक खर्चाची तरतूद केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी प्रास्ताविक केले. पोस्टर स्पर्धेतील विजेत्यांना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कल्पद्रुम मैदान ते पोलीस मुख्यालय या मार्गावर काढलेल्या पदयात्रेत लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, पोलीस, विद्यार्थी, युवक-युवती, महिला, सामाजिक संस्था व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ध्वनीफितीद्वारे अमली पदार्थविरोधी शपथ घेऊन सामूहिक नशामुक्तीचा संकल्प करण्यात आला.




# चार महिन्यापूर्वी पळून गेलेले युवक,युवती तामिळनाडू येथुन जेरबंद,युसूफ वडगाव पोलीसांची कारवाई

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील एका खेडेगावातील युवतीचे अपहरण केल्या प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्याचा युसूफवडगाव येथील जमादार केशव खाडे व महिला जमादार बेबी गंडले यांनी पर्दापाश करून युवक व युवती ला तामिळनाडू राज्यातुन आधुनिक तपास सोर्स वापरून जेरबंद करून युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात हजर केले आहे.चार महिन्यापूर्वी अज्ञात पीडितेच्या अपहरणाचा गुन्हा युसूफ वडगाव पोलिसात दाखल झाला होता.दरम्यान पोलीस अधीक्षक नवनीत कावत,अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शना खाली युसूफवडगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे,जमादार केशव खाडे,महिला जमादार बेबी गंडले, यांच्या पथकाने आधुनिक तपासाचा सोर्स वापरून पुणे, चाकण आणि शेवटी तामिळनाडू येथे जाऊन शुक्रवार दि.२१ आगस्ट रोजी पहाटे दोघांनाही ताब्यात घेवून शनिवार दि.२२ आगस्ट रोजी रात्री युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात हजर केले.

आरोपी रोहन अर्जुन समुद्रे वय २२वर्षे रा. चिंचपूर ता.धारूर याने चार महिन्यापासून अल्पवयीन युवतीवर अत्याचार केल्याचे निष्पन्न झाल्यावरून आरोपी विरुद्ध पोक्सो अंतर्गत कलमाचा समावेश करण्यात आला असून या प्रकरणाचा तपास पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उप निरीक्षक राकेश नेटके यांच्याकडे देण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.

# शारदा प्रतिष्ठानच्या १९ व्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते शिक्षक दिनी पुरस्कार वितरण



गेवराई प्रतिनिधी

शारदा प्रतिष्ठानच्या १९ व्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची अधिकृत घोषणा कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली. शनिवार, ५ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता गोदावरी सभागृह, र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते, आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण होणार आहे.

यावर्षी प्राथमिक विभागातून शेषेराव मराडे, संतोष कोठेकर, मिनीनाथ पिसे, गणेश घाटुळ, मुख्याध्यापक सुंदरराव तांबे, विजयकुमार शरणांगत, जालिंदर ठवरे आणि उध्दव क्षीरसागर यांची निवड झाली आहे. माध्यमिक विभागातून श्रीमती भारती कोकाट आणि तारेख शफिक शेख, तर विशेष पुरस्कारासाठी केंद्रप्रमुख श्रीमती वैशाली वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे.

पुरस्कारार्थी शिक्षकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन सपत्नीक गौरविण्यात येणार आहे. सन २००८ पासून माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा प्रतिष्ठानकडून शिक्षक दिनी हा उपक्रम राबविला जात आहे.

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ नारायणराव मोटे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीत प्रविण काळम पाटील, तात्यासाहेब मेघारे, मुख्याध्यापक विजय डोंगरे, विष्णू खेत्रे, अशोक निकाळजे, विष्णूपंत सोळुंके आणि सिध्देश्वर जंगले यांचा समावेश आहे. समितीचे समन्वयक प्राचार्य डॉ. शौकत पटेल आहेत.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची तटस्थपणे दखल घेऊन पुरस्कारार्थींची निवड केली जात असल्याने या पुरस्काराला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पुरस्कार सोहळ्यास शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अमरसिंह पंडित यांनी केले आहे.



# असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडियाच्या महाराष्ट्र शाखेच्या शिष्टमंडळाची राज्यपालांशी भेट

### राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना राष्ट्रीय महत्त्वाची दोन वैद्यकीय प्रकाशने भेट

मुंबई /प्रतिनिधी

असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडियाच्या महाराष्ट्र राज्य शाखेचे मानद सचिव डॉ. आगम वोरा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन येथे भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने राज्यपालांना राष्ट्रीय महत्त्वाची दोन वैद्यकीय प्रकाशने भेट देण्यात आली.

यापैकी 'युनिफाइड कन्सेन्सस ऑन अडल्ट इम्युनायझेशन २०२६' या प्रकाशनात प्रौढांच्या लसीकरणासंदर्भातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व शिफारसी देण्यात आल्या आहेत. हे प्रकाशन इंडियन मेडिकल असोसिएशनने विविध वैद्यकीय संस्थांच्या सहकार्याने प्रकाशित केले आहे.

दरवर्षी विषाणूजन्य संसर्गामुळे देशात सुमारे पाच लाख मृत्यू होतात. प्रभावी लसीकरणाच्या माध्यमातून यातील अनेक मृत्यू टाळता येऊ शकतात, अशी माहिती डॉ. आगम वोरा यांनी यावेळी दिली.

याप्रसंगी डॉ. राकेश बडदे, डॉ. मिलिंद नाडकर्णी, डॉ. अमित सराफ, डॉ. जयस लेले, आशुतोष पांडे तसेच झायडस हेल्थकेअरच्या एम.डी. स्वाती दलाल यांच्यासह संस्थेचे अन्य सदस्य उपस्थित होते.

## अभिजीत दीपकेंच्या स्कूल ठीक करो! चा इफेक्ट

# ग्रामविकास मंत्री आणि शिक्षण मंत्रीॲक्शन मोडमध्ये, संयुक्त बैठकीत जिल्हा परिषद शाळांबाबत मोठा निर्णय

मुंबई : कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपकेंच्या स्कूल ठीक करो! या देशात आणि राज्यात सुरू असलेल्या मोहिमेनंतर राज्य सरकार ॲक्शन मोडमध्ये आल्याचं पाहायला मिळतंय. जिल्हा परिषदेच्या शाळा महिन्याभरात सुविधांयुक्त कराव्यात असे निर्देश ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या संयुक्त बैठकीत शाळा सुधारण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. या बैठकीला ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजित सिंह देओल व इतर महत्वाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री जयकुमार गोरे यांनी शाळांच्या सुधारणांसाठी सूचना दिल्या. सध्या उपलब्ध पायाभूत सुविधांच्या आधारे शाळांचे वर्गीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या सुविधांच्या आधारे 'ए, बी, सी, डी' असे वर्गीकरण करण्यात यावे.




शाळांमधील पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज आणि वर्ग खोल्यांची स्थिती यांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन आठ दिवसांत अहवाल सादर करावा, असे निर्देश ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

शाळांमधील पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज आणि वर्ग खोल्यांची स्थिती यांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन आठ दिवसांत अहवाल सादर करावा.शाळांचे वर्गीकरण करताना मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, पुरेशा व सुव्यवस्थित वर्गखोल्या आणि वीज व्यवस्था यांचा प्राधान्याने विचार करावा. ज्या शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची किंवा स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नाही, तेथे ती तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करावी, असे निर्देश या बैठकीत ग्रामविकास मंत्री जयकुमार यांनी दिले.

शाळांमध्ये पाणी व स्वच्छतागृहांसारख्या मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ग्रामपंचायत निधीचा प्राधान्याने वापर करण्यात यावा.जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील पायाभूत सुविधांची पाहणी करावी.

# प्रक्षोभक भाषा करणा-या आमदारांवर गुन्हे दाखल करा

सांगली : प्रतिनिधी

सांगलीत एका मोर्चादरम्यान भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या एका वक्तव्यावरून आता राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लांडगे यांच्या या विधानाचे राजकीय पडसाद उमटत असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार पक्ष) खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रक्षोभक वक्तृत्व करणा-या वाचाळवीर आमदारांना वेळीच आवरा नाही तर गुन्हे दाखल करत अटक करावे अशी मागणी केली आहे.

सुप्रिया सुळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. माझी राज्याच्या गृहमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी अशा वाचाळवीर आमदारांना वेळीच आवरावे. अशा प्रक्षोभक वक्तव्यांमुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. आणि जर असे झाले, तर यामध्ये नाहक सर्वसामान्य आणि निष्पाप माणूस भरडला जाईल, अशी भीती सुळे यांनी व्यक्त केली आहे.

शिवराय, शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र

महाराष्ट्राच्या राजकीय आणि पुरोगामी संस्कृतीची आठवण करून देताना सुळे यांनी सत्ताधा-यांना थेट इशारा दिला. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे. हा राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र आहे. या शिवरायांच्या महाराष्ट्रात अशी गुन्हेगारी प्रवृत्तीची आणि दडपशाहीची भाषा अजिबात खपवून घेतली जाणार नाही, असे खडे बोल सुप्रिया सुळे यांनी सुनावले आहेत.



सांगलीत एका मोर्चादरम्यान भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या एका वक्तव्यावरून आता राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लांडगे यांच्या या विधानाचे राजकीय पडसाद उमटत असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार पक्ष) खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रक्षोभक वक्तृत्व करणा-या वाचाळवीर आमदारांना वेळीच आवरा नाही तर गुन्हे दाखल करत अटक करावे अशी मागणी केली आहे.

# जन्म-मृत्यू दाखल्याची नियमित प्रत आता १० रुपयांऐवजी २० रुपये

मुंबई : प्रतिनिधी

जन्म-मृत्यू दाखला काढणा-या नागरिकांसाठी आता महत्त्वाची बातमी आहे. राज्य शासनाने जन्म-मृत्यू दाखल्यासाठी आकारण्यात येणा-या विविध शुल्कांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील अधिसूचना ३१ जुलै रोजी जारी करण्यात आली असून, त्यामुळे नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.




आतापर्यंत जन्म किंवा मृत्यू दाखल्याची प्रत मिळवण्यासाठी १० रुपये शुल्क आकारले जात होते. मात्र, नव्या निर्णयानुसार हे शुल्क दुप्पट करून २० रुपये करण्यात आले आहे. अमरावती महापालिकेत सध्या दाखल्यासाठी १० रुपये शुल्क आकारले जात असून, शासनाच्या नव्या निर्णयानंतर लवकरच सुधारित दर लागू होण्याची शक्यता आहे. केवळ नियमित दाखल्याचे शुल्कच वाढलेले नाही, तर विलंबाने नोंदणी करणे, दाखल्याची दुसरी प्रत घेणे, जुन्या नोंदींचा शोध घेणे तसेच नावात दुरुस्ती करण्यासाठी आकारण्यात येणा-या शुल्कातही वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे विविध कारणांसाठी महापालिका किंवा संबंधित कार्यालयात दाखला काढण्यासाठी जाणा-या नागरिकांना पूर्वीपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागणार आहे.

दरम्यान, जन्म-मृत्यूची नोंद वेळेत न झाल्यास त्यासाठीच्या प्रक्रियेतही महत्त्वाचे नियम कायम ठेवण्यात आले आहेत. एका वर्षापेक्षा अधिक विलंब झालेल्या नोंदीसाठी उपविभागीय दंडाधिका-यांची परवानगी आवश्यक राहणार आहे. तर दोन वर्षांनंतर जन्म किंवा मृत्यूची नोंद करण्यासाठी न्यायालयाचा आदेश घेणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे विलंब झालेल्या नोंदींसाठी नागरिकांना अतिरिक्त कागदपत्रे आणि प्रशासकीय प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे.अमरावती शहरात दरवर्षी २५ हजारांहून अधिक जन्म-मृत्यू दाखले जारी केले जातात. त्यामुळे शुल्कवाढीचा परिणाम मोठ्या संख्येने नागरिकांवर होण्याची शक्यता आहे. विशेषत: विविध शासकीय योजना, शैक्षणिक कामे, वारसाहक्क, मालमत्ता व्यवहार किंवा इतर प्रशासकीय प्रक्रियांसाठी जन्म-मृत्यू दाखला आवश्यक असतो. त्यामुळे नव्या शुल्काची अंमलबजावणी कधीपासून होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अल्पवयीन मुलीचा संशयास्पद मृत्य

बारामती : प्रतिनिधी

बारामती शहरातील रुई परिसरातील साईनगर येथून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या स्वीय सहाय्यकाच्या अजित दशावतारेअल्पवयीन मुलीचा संशयास्पद स्थितीत मृतदेह आढळल्याने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, आमदार रोहित पवार बारामतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे दाखल झाले आहेत.साईनगर भागात मुलीचा मृतदेह मिळून आल्यानंतर स्थानिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. हा प्रकार हत्या आहे की मुलीने स्वत:चे जीवन संपवले, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता आलेली नाही. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी पंचनामा करत पुढील तपास सुरु केला आहे.

बारामती शहरातील रुई परिसरातील साईनगर येथून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे.

# गुणरत्न सदावर्तेंना दणका; अखेर गुन्हा दाखल

ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांच्यावर बीडमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विलास घुले हत्याप्रकरणाच्या संदर्भात बीडमध्ये शनिवारी विराट मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये भाषणादरम्यान गुणरत्न सदावर्ते यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप होत आहे. तसेच त्यांनी मनोज जरांगे पाटील यांना आपल्या भाषणातून धमकीवजा इशारा दिल्याचा देखील आरोप करण्यात आला आहे, आता या प्रकरणात गुणरत्न सदावर्ते यांच्याविरोधात बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अदखलपात्र स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी गंगधर काळकुटे यांच्या फिर्यादीवरून



शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुणरत्न सदावर्ते यांच्याविरोधात अदखलपात्र स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जरांगे पाटलांची लढाई आमच्या विरोधात नाही - मंत्री छगन भुजबळ

पुणे : / मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांच्या २९ ऑगस्टच्या आंदोलनाची जोरदार तयारी सुरू आहे. मराठा आक्षणावरून मनोज जरांगे आणि ओबीसीनेते मंत्री छगन भुजबळ यांच्यातील शाब्दीक संघर्ष उभ्या महाराष्ट्राने अनुभवला आहे. मात्र आज मंत्री छगन भुजबळ यांनी समता परिषदेच्या बैठकीत घेतलेल्या भूमिकेने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी (दि. २३ रविवार) राज्यभरातील समता परिषदेच्या पदाधिकार्यांची बैठक बोलावली होती. मंत्री भुजबळ यांनी संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकार्यांशी संवाद साधला. समता परिषदेच्या सर्व कार्यक्रमांची उजळणी केल्याचे सांगत छगन भुजबळ यांनी विविध मुद्यांवरप भाष्य केले. यावेळी, मनोज जरांगे पाटील यांच्या २९ ऑगस्ट रोजी होणार्या आंदोलनावरही त्यांनी आपली भूमिका मांडली, तर लक्ष्मण हाकेंकडून ओबीसींचे आरक्षण संपल्याबाबत सातत्याने होत असलेल वक्तव्य अमान्य असल्याचे बोलून दाखवले.

कोण म्हणते ओबीसीचे आरक्षण संपले? जात पडताळणीमध्ये चुका असेल तर त्यावर आम्ही लढतोय. २०११ पासून जात जनगणना करावी ही आमची मागणी होती, त्यावर सरकारने निर्णय घेतला आहे. सरकार आमच्यासोबत आहे, त्यावर आम्ही आता काय बोलणार, असा सवाल छगन भुजबळ यांनी केला. तसेच महात्मा फुले यांचे वांगमय भाषण यावर आम्ही मागणी केली, त्यावर सरकार काम करत आहे. अशी माहितीही त्यांनी दिली.

मनोज जरांगे यांची लढाई आमच्या विरोधात नाही, त्यावर आम्ही काय बोलणार, सरकार त्यावर बोलतील आणि निर्णय घेतील, असे भुजबळ म्हणाले. आम्ही जात जनगणना मागणी केली, त्यावर सरकार काम करत आहे. ओबीसीमध्ये किती जाती त्यावर सरकार निर्णय घेणार आहे. प्रत्येक राज्यात ओबीसींचे नाव त्यावर आम्ही मागणी केली तो शोध घेतला जात आहे. माळी समाज हा महाराष्ट्रात आहे, जेव्हा लढायचं तेव्हा मंत्रिपदाचा राजीनामा देऊन आम्ही राज्यात फिरलो. छगन भुजबळ हा काय घाबरला? असा सवाल नाही, असे म्हणत गरज होती तेव्हा आपण लढल्याचं भुजबळ म्हणाले. तर, सरकार आमच्यासोबत आहे म्हणून चर्चेतून आम्ही मार्ग काढत आहेत, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

राज्यात एल निनोचा प्रभाव: राज्यात एल निनोचा मोठा प्रादुर्भाव सर्वत्र दिसत आहे, काही ठिकाणी प्रचंड पाऊस झाला आहे तर काही ठिकाणी पाऊसच नाही. पुन्हा उष्णता वाढलेली आहे, हा ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम आहे, असे भुजबळ म्हणाले.

तुकाराम मुंडेचे कौतुक : तुकाराम मुंढे चांगल काम करत आहेत, अन्न हा असा प्रकार आहे, जो श्रीमंत गरीब सर्वांसाठी आवश्यक आहे. स्वच्छता असणे हे त्यासाठी महत्वाचे आहे. तुकाराम मुंढे ज्यावर बोट ठेवतात त्यावर सगळेच मागणी करतात, तशीच मागणी अंगणवाडी समितीने केल्याचे सांगत अंगणवाडीतील भोजनव्यवस्थेवरही भुजबळांनी भूमिका मांडली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# शेतहमालाच्या मुलाची एमपीएससीत गरुडझेप

नवव्या प्रयत्नात अशोक शिरसाट राज्यकर निरीक्षक, ग्रामस्थांकडून आई–वडिलांसह सत्कार

मस्साजोग /प्रतिनिधी

आईने शेतमजुरी तर वडिलांनी कारखान्यावर व शेतात हमाली करून कुटुंबाचा गाडा हाकत मुलाच्या शिक्षणाला पाठबळ दिले. या कष्टांचे चीज करत आरंणगाव (ता. केज, जि. बीड) येथील अशोक युवराज शिरसाट याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत वंजारी समाजातून राज्यात पाचवा क्रमांक मिळवत राज्यकर निरीक्षक पदाला गवसणी घातली. नवव्या प्रयत्नात मिळवलेल्या या यशाबद्दल ग्रामस्थांनी अशोकसह त्याच्या आई–वडिलांचा गुलाल उधळून, पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.



अशोकचे प्राथमिक शिक्षण आरंणगाव येथील जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण काळेगाव येथील हायस्कूलमध्ये झाले. घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती असतानाही त्याने संभाजीनगर येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू ठेवला. आई–वडिलांनी कष्ट करून त्याच्या शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ दिले. अखेर अशोकने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर अधिकारी होण्याचे आई–वडिलांचे स्वप्न पूर्ण केले.

ग्रामस्थांच्या हस्ते सत्कार

अशोकचा सत्कार निवृत्त मुख्याध्यापक दादासाहेब गिते, शामसुंदर सिरसट, सुधीर भांगे, चेअरमन आश्रुबा भांगे, ग्रामरोजगार सेवक रामेश्वर सिरसट, श्रीराम गिते, अशोक पोपळे, परसराम पोपळे, विजय शिरसाट, अनिकेत बोरडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी त्याला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

'मुलगा अधिकारी झाला, यापेक्षा मोठा आनंद नाही'

आयुष्यभर दुसऱ्याच्या इथे हमाली व कष्ट केले; मात्र मुलाला शिकवण्याचा निर्धार सोडला नाही. आज आमचा मुलगा राज्यकर विभागात अधिकारी झाला, यापेक्षा मोठा आनंद दुसरा नाही, अशी भावनिक प्रतिक्रिया अशोकच्या आई–वडिलांनी दिली.

अशोकचा ग्रामीण विद्यार्थ्यांना संदेश

यशासाठी परिस्थिती नव्हे, तर जिद्द महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील मुलांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने अभ्यास व मेहनत घ्यावी, असा मोलाचा संदेश अशोकने दिला. पंख असणे पुरेसे नाही; उड्डाणासाठी हौसलेही आवश्यक असतात, हा त्याच्या यशाचा प्रेरणादायी संदेश ठरला आहे.

# बीडमध्ये २६ ऑगस्टला दशनाम गोसावी समाजाचे राज्यस्तरीय महाअधिवेशन

हक्क, अस्तित्व व इनाम जमीन प्रश्नावर मंथन, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : ओमप्रकाश गिरी

बीड /प्रतिनिधी

दशनाम गोसावी समाज परिषद, महाराष्ट्र राज्य व मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे राज्यस्तरीय महाअधिवेशन बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे.

महाअधिवेशनात समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व आर्थिक विकासासह इनाम जमीन हक्क, सामाजिक न्याय, अस्तित्व व संघटनात्मक सक्षमीकरण या विषयांवर चर्चा होणार आहे.

यावेळी समाजप्रबोधन, राज्यस्तरीय पुरस्कार वितरण, गुणवंत विद्यार्थी–कर्मचारी व महिला सन्मान तसेच इनाम जमीन हक्क जनजागृती कार्यक्रम होणार आहेत.

ह.भ.प. महंत नारायण महाराज गिरी (उजैनीपिंप्री) व ह.भ.प. महंत महादेव महाराज गिरी (चाकूरवाडी) प्रमुख उद्घाटक असून ॲड. जगदेवजी गिरी अध्यक्षस्थानी राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, ना. अतुलजी सावे, आ. विजयसिंहजी पंडित, आ. संदीपजी (भैय्या) क्षीरसागर, आ. सुरेशरावजी (अण्णा) धस उपस्थित राहणार आहेत.

श्री. यशवंत गोसावी सर व युवा वक्ते श्री. राहुल गिरी यांचे मार्गदर्शन लाभणार असून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा जीवनगौरव, समाजमित्र, गोसावी समाजभूषण, आदर्श शिक्षक, अध्यात्मिक कार्यगौरव व आदर्श महिला संस्था पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे.



धर्मध्वज मिरवणूक

इनाम जमीन हक्क जनजागृतीसाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सकाळी १० वाजता धर्मध्वज व आद्यगुरू शंकराचार्यांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्थापक अध्यक्ष राजेंद्र बन व जिल्हाध्यक्ष श्रीमहंत दत्तात्रय गिरी यांनी महाराष्ट्रातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाअधिवेशन यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी– टाटा ट्रस्टच्या करारातून रुग्णांना दिलासा

## पहिल्याच करारातून ९ रुग्णांना ८९.६० लाखांची मदत

मुंबई /प्रतिनिधी

यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्ट यांच्यात झालेल्या सामंजस्य करारामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि टाटा ट्रस्ट यांच्यात १२ फेब्रुवारी २०२६ रोजी हा पहिला सामंजस्य करार झाला. या करारांतर्गत १५० गरजू रुग्णांना गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मदत देण्याचे उद्दिष्ट आहे. इतर नामांकित संस्थांसोबतही असे करार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, पैशांअभावी कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, हा त्यामागील उद्देश आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी गरजू रुग्णांनी अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# अपुऱ्या पावसाने खरीप पिके संकटात, पंचनामे करून नुकसानभरपाई द्या

शिवसंग्रामचे मुख्यमंत्र्यांसह कृषिमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन

बीड /प्रतिनिधी

बीड तालुक्यात यंदा कापूस, सोयाबीन, उडीद आदी खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड झाली; मात्र समाधानकारक पाऊस न झाल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. फुलोऱ्यातील सोयाबीन तसेच बोंड अवस्थेतील कपाशीला अपुऱ्या पावसाचा मोठा फटका बसला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसंग्रामच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देऊन नुकसानग्रस्त पिकांचे महसूल यंत्रणेमार्फत तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.




यावेळी शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, शहराध्यक्ष सुहास पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सचिन कोटुळे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, योगेश शेळके, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, मनोज जाधव, गणेश मोरे, गणेश साबळे, चंद्रकांत देवकर, विठ्ठल ढोकणे, देविदास मेंगडे, नामदेव धांडे, लाला भाई, लक्ष्मण शिंदे, उमेश शिंदे, बाळू रांजवण आदी उपस्थित होते.

# मालेगाव येथे ॲड. अमन (भैया) आनंदराज आंबेडकर यांचा सत्कार

परळी /प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे २३ ऑगस्ट रोजी अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा महामोर्चा पार पडला.



प्रा. डॉ. दशरथ रोडे यांनी पुष्पगुच्छ देऊन केला सन्मान, सामाजिक व संविधानिक चळवळीवर चर्चा

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे युवा मार्गदर्शक ड. अमन (भैया) आनंदराज आंबेडकर यांची प्रा. डॉ. दशरथ वैजनाथ रोडे यांनी सदिच्छा भेट घेऊन पुष्पगुच्छ देत सत्कार केला.

यावेळी अनुसूचित जाती समाजाचे प्रश्न, सामाजिक न्याय, समता, संविधानिक हक्क तसेच महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी महोत्सवानिमित्त राज्यभर जनजागृती करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.प्रा. डॉ. दशरथ रोडे यांनी ड. अमन आंबेडकर यांच्या युवा नेतृत्वाचे कौतुक करून वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सुरू असलेल्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी ड. अमन आंबेडकर यांनी प्रा. डॉ. रोडे यांचे आभार मानत रिपब्लिकन पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, तळागाळातील युवकांना जोडणे आणि शिक्षण, संघटन व संघर्षाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडविण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.या सदिच्छा भेटीमुळे उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत

लातूर /प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व शासन मान्यताप्राप्त अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमधील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी २.० पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन लातूर समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे. सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता अकरावी, बारावी, तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व नवीन आणि नूतनीकरण करणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० पोर्टलवर सर्वप्रथम आपला ओळख क्रमांक वापरून महाआयडी तयार करणे बंधनकारक आहे.

या प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी आपला पत्ता, मोबाईल क्रमांक व ई–मेल माहिती अद्ययावत ठेवावी आणि भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न विद्यार्थ्यांना मिळणारा निर्वाह भत्ता या योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला यासह इतर सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात संकलित करून ठेवावीत. शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे ही प्रवेश प्रक्रियेचाच एक भाग असल्याने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरून त्याची हार्ड कॉपी संबंधित महाविद्यालयात तात्काळ जमा करावी, तर महाविद्यालयांनी हे अर्ज विनाविलंब समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडे फॉरवर्ड करावेत, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

# धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय गणेश मंडळांनी वर्गणी गोळा केल्यास गुन्हे दाखल होणार

बीड (जि मा का)

गणेशोत्सव व दुर्गात्सव साजरा करण्यासाठी सार्वजनिक वर्गणी गोळा करण्यापूर्वी धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. पूर्वपरवानगी शिवाय वर्गणी गोळा केल्याचे आढळून आल्यास संबंधित गणेश मंडळांविरुद्ध गुन्हे दाखल केले जाऊ शकतात, असे आवाहन धर्मादाय उप आयुक्त कार्यालयाने केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१–क अन्वये सार्वजनिक वर्गणी किंवा देणगी गोळा करण्यासाठी ऑनलाइन परवानगीची तरतूद करण्यात आली आहे. नोंदणीकृत संस्था अथवा न्यास वगळता इतर सर्व मंडळांना ही परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रे:

मंडळातील सदस्यांचे अधिकृत ओळखपत्र (आधार, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा मतदान ओळखपत्र) जागेचे संमतीपत्र किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका) ना–हरकत प्रमाणपत्र मंडळ स्थापनेचा व उत्सव समितीचा ठराव जुन्या मंडळांसाठी मागील वर्षाचा खर्चाचा हिशोब व जमा–खर्च ५००० रुपयांपेक्षा जास्त असल्यास लेखापरीक्षक (उ–) अहवाल कार्यकारी मंडळाच्या प्रतिनिधींची नावे, पत्ते, संपर्क क्रमांक, पावती पुस्तकांचा तपशील व वर्गणीचा हिशोब ऑनलाइन अर्ज कसा कराल ?

मंडळांनी धर्मादाय विभागाच्या हीींि:// लहरीळ.ारहरीरिहीीर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन '४१–क' या पर्यायावर क्लिक करावे. अर्जातील सर्व माहिती भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, छाननी करून ऑनलाइन परवानगी दिली जाईल.विनापरवानगी किंवा बेकायदेशीरपणे वर्गणी जमा करून गैरवापर केल्यास पोलिसांकडून कठोर कारवाई केली जाईल, असे धर्मादाय उप आयुक्त कांचनगंगा जाधवांनी स्पष्ट केले आहे.

# मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात विद्यापीठाचे योगदान : प्राचार्य डॉ. विश्वास कदम

जय भवानी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन उत्साहात

पाटोदा /प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. विद्यापीठासमोर ज्ञाननिर्मितीसोबत तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्यविकास, रोजगारनिर्मिती व सामाजिक बांधिलकीची आव्हाने असून त्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत.



कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी ७.४५ वाजता प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणातून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन केले.

सिनेट सदस्या प्रा. डॉ. कल्पना घारगे, प्रा. डॉ. सुनील जाधव व प्रा. सोमनाथ घाडगे यांनीही मार्गदर्शन केले. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ चे उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून डॉ. प्रवीण शिलेदार यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. प्रविण शिलेदार व प्रा. डॉ. बडू लोखंडे यांनी केले. आभार ग्रंथपाल श्रीमती प्रा. ज्योती रकटे यांनी मानले. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपघातात हात गमावलेल्या महेशला मिळाले नवे बळ!

आ. सुरेश धस यांच्या पुढाकारातून पावणे दोन लाखांचा अत्याधुनिक कृत्रिम हात

पाटोदा प्रतिनिधी

सैन्य व पोलीस भरतीचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करणाऱ्या महेश हरदास भाकरे याचा सहा महिन्यांपूर्वी झालेल्या अपघातात एक हात गमावला. मात्र, आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून आयोजित मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरामुळे महेशच्या आयुष्याला पुन्हा नवी दिशा मिळाली आहे.

स्थानिक सरपंच गणेश तांबे यांनी महेशला शिबिरात दाखल केले. तपासणीनंतर पुण्यातील इनाली फाउंडेशनच्या माध्यमातून सुमारे १ लाख ७५ हजार रुपये किमतीचा अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात उपलब्ध करून देण्यात आला.

या प्रक्रियेसाठी ड. महेश बेदरे आणि सोमनाथ कोळेकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला.



कृत्रिम हात मिळाल्यानंतर महेशच्या चेहऱ्यावर पुन्हा आत्मविश्वास आणि आनंद फुलला असून, त्याच्या स्वप्नांना नव्या उमेदीने सुरुवात झाली आहे.

या संवेदनशील उपक्रमाबद्दल आ. सुरेश धस व त्यांच्या सहकाऱ्यांचे पाटोदा परिसरातून कौतुक होत आहे.

सैन्य व पोलीस भरतीचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करणाऱ्या महेश हरदास भाकरे याचा सहा महिन्यांपूर्वी झालेल्या अपघातात एक हात गमावला.

# केसरेकर दाम्पत्याच्या मुलांचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतले शैक्षणिक पालकत्व

सांगली : कुपवाड येथील घटनेत मृत्यू झालेल्या केसरेकर दाम्पत्याच्या दोन्ही मुलांची भेट घेऊन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी त्यांचे सांत्वन केले व त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. यावेळी खासदार विशाल पाटील, आमदार डॉ. सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, महापौर धीरज सूर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, बाळासाहेब यादव, संदीप आवटी, उपमहापौर गजानन मगदूम, नगरसेवक विष्णू माने आदी उपस्थित होते.

विवाहसोहळ्यापासून कौटुंबिक कार्यक्रमांपर्यंत

# 'हॉटेल गोल्डन चॉईस' ठरतेय खास आकर्षण.!

बीड / आयेशा शेख

विवाहसोहळा असो, साखरपुडा, वाढदिवस, कौटुंबिक समारंभ किंवा महत्त्वाची बैठक... प्रत्येक कार्यक्रमासाठी उत्तम नियोजन, आकर्षक वातावरण आणि पाहुण्यांच्या सुविधांना प्राधान्य देणारे हॉटेल गोल्डन चॉईस नागरिकांसाठी एक चांगला पर्याय ठरत आहे.

विविध कार्यक्रमांचे आयोजन अधिक सोयीस्कर आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्हावे, यासाठी हॉटेल गोल्डन चॉईस येथे लग्न समारंभ, साखरपुडा, वाढदिवस, सेवा निवृत्ती समारंभ, बैठका तसेच विविध सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी हॉलची व्यवस्था उपलब्ध आहे.

कार्यक्रमासोबतच पाहुण्यांच्या निवासाचीही सुविधा मिळावी, यासाठी हॉटेल गोल्डन चॉईसमध्ये उत्कृष्ट लॉजिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. कुटुंबीयांसाठी स्वतंत्र व्यवस्था असल्याने विविध कार्यक्रमांसाठी येणाऱ्या नागरिकांना अधिक सोयीस्कर अनुभव मिळू शकतो.

कार्यक्रमाचे आयोजन, पाहुण्यांची व्यवस्था आणि निवासाची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यावर हॉटेल गोल्डन चॉईसकडून भर देण्यात आला आहे. त्यामुळे विवाहसोहळे, कौटुंबिक कार्यक्रम, सामाजिक समारंभ तसेच विविध बैठका आयोजित करण्यासाठी हे ठिकाण आकर्षक पर्याय ठरू शकते.

एक वेळ अवश्य भेट द्या... या आवाहनासह हॉटेल गोल्डन चॉईसकडून नागरिकांना हॉटेलला भेट देऊन उपलब्ध सुविधा जाणून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संपर्क :
प्रो. प्रा. बप्पासाहेब घुगे – ९५९२२५२५२५
रेस्टॉरंट – ९१५८९६२५२५
लॉजिंग – ९११६७४२५२५

# दैनिक 'वास्तव'चा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा 'रायटर अँड फायटर' पुरस्कार जाहीर

## निवासी संपादक अरविंद ओव्हाळ, वडवणी तालुका प्रतिनिधी अशोक फपाळ ठरले मानकरी

बीड : प्रतिनिधी

दैनिक 'वास्तव'चे निवासी संपादक अरविंद ओव्हाळ आणि वडवणी तालुका प्रतिनिधी अशोक फपाळ यांना यंदाचा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा असलेला 'रायटर अँड फायटर' पुरस्कार मुख्य संपादक जितेंद्र सिरसाट यांनी जाहीर केला आहे. या पुरस्काराचे वितरण 'वास्तव'च्या सभागृहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दिमाखदार सोहळ्यात आयोजित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे असून मोठ्या थाटात आणि शानदार कार्यक्रमामध्ये पुरस्काराचे वितरण होणार असून पुरस्कार प्राप्त पत्रकारांना यथोचित गौरविण्यात येणार आहे.

'रायटर अँड फायटर' हा पुरस्कार कोणत्या पत्रकारांना दिला जातो?

ज्या पत्रकारांची पत्रकारिता अत्यंत उत्तम तसेच सत्याचा शोध घेणारी, निष्पक्ष, आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून जबाबदारी पार पाडणाऱ्या पत्रकारांना 'रायटर अँड फायटर' हा दैनिक 'वास्तव'चा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला जातो. सदरील पुरस्कार प्राप्त पत्रकारांनी समाजातील प्रत्येक घटकाचा आवाज बनून तथ्यांवर आधारित आणि पारदर्शक माहिती लोकांसमोर मांडलेली पाहिजे. त्याचप्रमाणे बातमी देताना सत्यता, दुजाभाव न ठेवता केवळ खऱ्या पुराव्यांवर भर देत कोणत्याही





दबावाखाली न येता वस्तुस्थिती जशीच्या तशी मांडणारे निर्भिड, निष्पक्ष पत्रकार असायला हवेत. विशेष म्हणजे आणखी एक महत्त्वाची बाब अशी की, या पत्रकारांना सामाजिक जबाबदारीचे भान असणे आवश्यक आहे.

अरविंद ओव्हाळ, अशोक फपाळ ठरले यंदाचे मानकरी

सत्तेवर असलेल्या यंत्रणा आणि सरकार यांच्या कामावर योग्य तो अंकुश ठेवण्याबरोबरच

समाजातील उपेक्षित आणि सर्वसामान्य लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम दैनिक 'वास्तव'चे निवासी संपादक अरविंद ओव्हाळ आणि वडवणी तालुका प्रतिनिधी अशोक फपाळ यांनी केले आहे. अरविंद ओव्हाळ आणि अशोक फपाळ हे त्या त्या भागामध्ये पत्रकारिता करत असताना त्यांनी सदैव खोट्या बातम्या किंवा दिशाभूल करणाऱ्या प्रचारापासून नेहमी दूर राहणे पसंत केले. एकूणच निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता करीत असताना ओव्हाळ आणि फपाळ यांनी आपली पत्रकारिता समाज हिताची आणि समाजाला नवी दिशा देण्यासाठी वाहून घेतलेली आहे. म्हणून त्यांना 'रायटर अँड फायटर' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

# मन्यारवाडी येथे र. भ .अट्टल महाविद्यालयाकडून वृक्षलागवड

गेवराई, दि. २४ (प्रतिनिधी) र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मन्यारवाडी-गोविंदवाडी येथे वृक्ष दिंडी काढण्यात आली. त्यानंतर वृक्षलागवड व शेतकरी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संत गाडगेबाबा यांच्या शतकोत्तर सुवर्ण (१५०) महोत्सवी वर्षानिमित्त तसेच 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला.

या उपक्रमांतर्गत मन्यारवाडी येथील जिल्हा परिषद शाळा परिसर तसेच स्मशानभूमी परिसरात वृक्षलागवड करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध वृक्षांची लागवड केली. यावेळी वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचे आवाहन ग्रामस्थांना करण्यात आले.

यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक गावातील शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन शेतकरी संवाद साधला. यावेळी शेती व्यवसायातील अडचणी, पाणी उपलब्धता, पिकांची सद्यस्थिती, शेतीतील बदलते तंत्रज्ञान, उत्पादन खर्च तसेच शेतकऱ्यांच्या विविध समस्या याबाबत विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांकडून माहिती जाणून घेतली.




या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन, शेती व्यवसाय आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. वृक्षलागवड आणि शेतकऱ्यांशी थेट संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरणाविषयी जागरूकता आणि ग्रामीण समाजाच्या प्रश्नांची जाणीव निर्माण झाली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. डॉ. रजनी शिखरे यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. देविदास रिठे, डॉ. प्रदीप दहिंडे, डॉ. उदय खरात, डॉ. दीपक डोंगरे, प्रा. सय्यद तौफिक यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी तसेच मन्यारवाडी येथील जिल्हा परिषद मुख्याध्यापक, ग्रामस्थ बाबासाहेब डिंगरे आणि शेतकरी लक्ष्मण यादव यांचे सहकार्य लाभले.

# आष्टी येथील दत्त मंदिरात तीन दिवसीय पुण्यतिथी उत्सव

## धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल;पारायण, महापूजा,रुद्राभिषेक,प्रवचन अन् पालखी सोहळ्याचे आयोजन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

आष्टी येथील सार्वजनिक श्री दत्त मंदिराचे संस्थापक प.पू. रघुनाथ महाराज कालकुंद्रीकर आणि प.पू. शामला रघुनाथ कालकुंद्रीकर यांच्या वार्षिक पुण्यतिथीनिमित्त बुधवार, दि. २६ ऑगस्ट ते शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट या कालावधीत तीन दिवसीय पुण्यतिथी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवानिमित्त मंदिरात विविध धार्मिक, आध्यात्मिक व भक्तिमय कार्यक्रमांची रेलचेल राहणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

उत्सवाची सुरुवात बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी श्री स्वात्म्यसौख्य ग्रंथाच्या सामुदायिक पारायणाने होणार आहे. त्यानंतर श्री सत्यदत्त महापूजेचा धार्मिक



कार्यक्रम पार पडेल. सायंकाळच्या आरतीनंतर श्री सद्गुरू सेवेकरी मंडळाच्या वतीने सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे पहिल्याच दिवशी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार आहे.

गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी पुण्यतिथीचा मुख्य दिवस असून, सकाळी श्रींच्या मूर्तीवर मंत्रोच्चाराच्या गजरात रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. दिवसभर विविध धार्मिक विधी पार पडणार असून, सायंकाळच्या आरतीनंतर मंदिर परिसरात श्रींच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पालखी सोहळ्यात भाविक मोठ्या संख्येने सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत मंदार महाराज रामदासी यांचे सुश्राव्य व मार्गदर्शक प्रवचन होणार आहे. या प्रवचनातून भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन मिळणार आहे. त्यानंतर दुपारी १ ते ३.३० या वेळेत भाविकांसाठी मधुकरी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ५ वाजता श्रींच्या पालखीची मिरवणूक काढण्यात येणार असून, यानंतर तीन दिवसीय पुण्यतिथी उत्सवाची सांगता होणार आहे.

प.पू. रघुनाथ महाराज कालकुंद्रीकर आणि प.पू. शामला रघुनाथ कालकुंद्रीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्यात पारायण, महापूजा, रुद्राभिषेक, भजन, प्रवचन, महाप्रसाद आणि पालखी मिरवणूक असे विविध कार्यक्रम होणार असल्याने आष्टी शहरासह परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या तीन दिवसीय पुण्यतिथी उत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे.

# आंध्र प्रदेशातील कुप्पमच्या प्रशिक्षणातून बीडच्या शिक्षकांची ज्ञानयात्रा, शैक्षणिक गुणवत्तेला नवी दिशा!

## बीड जिल्ह्यातील निवडक शिक्षकांनी सहभागी होत जिल्ह्याचे गौरवपूर्ण प्रतिनिधित्व केले

माजलगाव / प्रतिनिधी

आंध्रप्रदेशातील कुप्पम येथे आयोजित विशेष गणित व विज्ञान शिक्षक प्रशिक्षणात बीड जिल्ह्यातील निवडक शिक्षकांनी सहभागी होत आपल्या जिल्ह्याचे गौरवपूर्ण प्रतिनिधित्व केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी - केंद्रित शिक्षण मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे प्रशिक्षण शिक्षकांसाठी ज्ञान, अनुभव आणि नव्या शैक्षणिक दृष्टिकोनाची समृद्ध पर्वणी ठरले.

या प्रशिक्षणात बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत हम्पे मॅडम ( जि. प.माध्यमिक शाळा चौसाळा मुख्याध्यापिका ) दिपक मोरे सर (दौला वडगाव - केंद्रप्रमुख), प्रकाश गोरे सर (उपळी हायस्कूल, उपळी), विनायक सरवदे ( माध्यमिक विद्यालय पिंपरखेड ), जाधव सर (जि. प. माध्यमिक शाळा, धोंडराई), मगरे मॅडम (जि. प. माध्यमिक शाळा, माजलगाव) आणि तवले सर (जि. प. माध्यमिक शाळा, टाकळशिंग)

श्रुती लहाने मॅडम ( साने गुरुजी निवासी विद्यालय केज ) सूर्यवंशी सर, शिंदे सर ( योगेश्वरी विद्यालय अंबाजोगाई ) यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.

या प्रशिक्षणादरम्यान नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान, कृती आधारित शिक्षण, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आणि विविध शैक्षणिक उपक्रम यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी शिक्षकांना मिळाली. विविध भागांतून आलेल्या शिक्षकांसोबत विचारांची व अनुभवांची देवाणघेवाण झाल्यामुळे अध्यापनाकडे पाहण्याचा नवा आणि व्यापक दृष्टिकोन विकसित झाला.

विशेष म्हणजे, बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यासह विविध तालुक्यांतील शिक्षकांनी राष्ट्रीय स्तरावरील या शैक्षणिक उपक्रमात सहभागी होत आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. हा सहभाग केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित न राहता, कुप्पममध्ये मिळालेले ज्ञान, अनुभव आणि नव्या अध्यापन पद्धती आपल्या शाळांपर्यंत पोहोचवून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे, हीच या प्रशिक्षणाची खरी फलश्रुती ठरणार आहे.

ही अमूल्य संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जतिन रहमान साहेब, शिक्षणाधिकारी मा. जयश्री चव्हाण मॅडम, मा. प्रिया राणी पाटील मॅडम तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई यांचे या सहभागी शिक्षकांतर्फे मनःपूर्वक आभार मानले जात आहेत.या ज्ञानयात्रेत सहभागी झालेल्या बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षकांचे शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

आपली शिकण्याची जिद्द, प्रयोगशील वृत्ती, नेतृत्वगुण आणि शिक्षणाप्रती असलेली निष्ठा निश्चितच इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

कुप्पममध्ये मिळालेले ज्ञान आता बीड जिल्ह्यातील प्रत्येक शाळेपर्यंत पोहोचावे आणि त्या ज्ञानातून हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा मिळावी हीच सदिच्छा.

# ग्रामविकास विभागाकडून गावगाड्याच्या प्रश्नांवर अपेक्षित संवाद होत नसल्याची खंत

## दत्ता काकडे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष घालण्याचे आवाहन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

ग्रामपातळीवरील विकासकामे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न आणि गावांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायती, सरपंच व उपसरपंच यांच्याशी शासनाच्या संबंधित विभागांनी सातत्याने संवाद साधणे आवश्यक आहे. मात्र, ग्रामविकास विभागाकडून गावगाड्याच्या संदर्भातील प्रश्नांवर अपेक्षित तो संवाद होत नसल्याची खंत सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी व्यक्त केली आहे. या गंभीर बाबीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

गावाचा विकास हा केवळ शासनाच्या योजनांमधून होत नसून, त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायती आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून होतो. गावातील पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसह विविध मूलभूत प्रश्नांची प्रत्यक्ष माहिती सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना असते. त्यामुळे गावांच्या विकासासंदर्भात शासन आणि ग्रामपंचायत यांच्यामध्ये सातत्यपूर्ण संवाद व समन्वय असणे गरजेचे असल्याचे दत्ता काकडे यांनी अधोरेखित केले.

ग्रामविकास विभागाकडून गावगाड्या संदर्भात पाहिजे तो संवाद होत नाही, हे दुर्दैव आहे, अशी स्पष्ट भूमिका दत्ता काकडे यांनी मांडली



आहे. ग्रामपंचायतींना भेडसावणाऱ्या अडचणी, विकासकामांतील अडथळे तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील समस्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी संवादाचे माध्यम अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायतींचा एक मजबूत आवाज निर्माण करून गावांच्या विकासासाठी संघर्ष करण्याचा निर्धार सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राने व्यक्त केला आहे. संवाद, सहकार्य आणि संघर्षातूनच विकासाचा मार्ग या भूमिकेतून ग्रामपंचायतींच्या प्रश्नांना शासनदरबारी योग्य व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे संघटनेच्या भूमिकेतून स्पष्ट होते.

गावांचा विकास हा गावकऱ्यांच्या सहभागातून आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे साधता येतो. त्यामुळे गावांच्या विकासाशी संबंधित निर्णयप्रक्रियेत ग्रामपंचायत प्रतिनिधींना विश्वासात घेणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामविकास विभागाच्या कार्यपद्धतीकडे लक्ष देऊन सरपंच व ग्रामपंचायत प्रतिनिधींशी थेट संवादाची प्रभावी व्यवस्था निर्माण करावी, अशी अपेक्षा दत्ता काकडे यांनी व्यक्त केली आहे.

एकत्र येऊया, हक्कासाठी लढूया, गावाच्या विकासासाठी पुढे जाऊया! या संदेशातून सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राने ग्रामपंचायत प्रतिनिधींना एकत्रितपणे गावांच्या विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या मूलभूत बाबींना प्राधान्य देऊन गावांचा विकास साधण्यासाठी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांशी अधिक परिणामकारक समन्वय साधावा, अशी मागणी पुढे आली आहे.

दत्ता काकडे, प्रदेशाध्यक्ष, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र यांनी मांडलेल्या या भूमिकेमुळे ग्रामविकास विभाग आणि ग्रामपंचायती यांच्यातील संवादाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रश्नाकडे कोणती भूमिका घेतात, याकडे ग्रामपंचायत प्रतिनिधींचे लक्ष लागले आहे.

ग्रामपातळीवरील विकासकामे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न आणि गावांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायती, सरपंच व उपसरपंच यांच्याशी शासनाच्या संबंधित विभागांनी सातत्याने संवाद साधणे आवश्यक आहे.

# जाती-धर्माच्या भेदभावाचे राजकारण धोकादायक- डॉ. अशोक ढवळे यांची टीका

## संवैधानिक मूल्ये जपत लोकशाही जतन करूया – कॉ. डॉ. अजित नवले

परळी / प्रतिनिधी :

देशातील वाढती सामाजिक विषमता, जातीय-धार्मिक ध्रुवीकरण आणि आर्थिक असमानतेच्या पार्श्वभूमीवर जाती-धर्माच्या विचारधारेवर टीका करताना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकप) ज्येष्ठ नेते कॉ. डॉ. अशोक ढवळे यांनी, जाती-धर्माच्या आधारावर समाजात भेदभाव निर्माण करणारी विचारधारा लोकशाही आणि सामाजिक ऐक्यासाठी धोकादायक आहे, असा आरोप केला तर देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, सत्ताकेंद्री राजकारण आणि लोकशाही मूल्यांवरील वाढते आघात या पार्श्वभूमीवर 'चला राजकारण शुद्ध करूया' या व्यापक भूमिकेतून भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) वतीने मराठवाडा विभागीय मेळावा परळी येथे सोमवार दि २४ रोजी उत्साहात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना कॉ. डॉ. अजित नवले यांनी संविधानाने देशाला दिलेली लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय आणि समतेची मूल्ये जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. संविधानिक मूल्यांवर आघात होत असताना सर्व श्रमिक वर्गांनी एकत्र येत पैसा, धर्म-जात, भ्रष्टाचार, गुंडागर्दी यामुळे गलिच्छ झालेले राजकारण शुद्ध करण्याची गरज निर्माण झाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कॉ. आ. विनोद निकोले यांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका करताना 'अच्छे दिन'चे आश्वासन देऊन सत्तेवर आलेल्या सरकारच्या काळात सर्वसामान्यांच्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्याचा आरोप केला. महागाईमुळे कष्टकरी, शेतकरी, कामगार, महिला आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक




## 'अच्छे दिन'च्या नावाखाली महागाई जनतेच्या पदरी –आ. विनोद निकोले

गणित कोलमडले आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून सत्ताकेंद्री राजकारणाला प्राधान्य दिले जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

मेळाव्यात व्यासपीठावर माकपचे अध्यक्षीय मंडळ सदस्य कॉ.मरियन ढवळे, कॉ.विजय गाभणे,कॉ.पी.एस.घाडगे, श्याम सुंदर सोन्नर महाराज, कॉ.ॲड.अजय बुरांडे,कॉ.बब्रूवाण पोटभरे, कॉ मारोती खंदारे, कॉ. उद्धव पोळ, कॉ. उज्वला पडलवार, कॉ. सुधाकर शिंदे, कॉ.भगवान भोजने, कॉ.रोहिदास जाधव आदीसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

समाजातील विविध घटकांना एकमेकांविरोधात उभे करण्याऐवजी देशातील जनतेला त्यांच्या मूलभूत प्रश्नांवर एकत्र आणण्याची गरज आहे. देशातील आर्थिक धोरणांवर भाष्य करताना कॉ. डॉ. डी. एल कराड यांनी मोठ्या उद्योगपतींना मिळणाऱ्या कर्जमाफीवरही प्रश्न उपस्थित केला. भांडवलदारांचे तब्बल १५ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले जाते; मात्र कर्जबाजारी शेतकरी आणि सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारकडे ठोस धोरण नाही, अशी टीका करत सामान्य नागरिकांचे प्रश्न, शेतकरी-कामगारांचे प्रश्न, शिक्षण, रोजगार, महागाई आणि सामाजिक न्याय यांसाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याची गरज निर्माण झाली असल्याचे मत यावेळी मेळाव्यात व्यक्त करण्यात आली. या मेळाव्याचे प्रस्ताविक जिल्हा सचिव मंडळ सदस्य कॉ.विजय गाभणे तर आभार कॉ.पी.एस.घाडगे यांनी केले. मेळाव्यास मराठवाड्यातील आठ ही जिल्हयातुन पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी, कामगार, असंघटित क्षेत्रातील विविध कामगार वर्ग, विद्यार्थी युवक सामाजिक कार्यकर्ते तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झुंजार क्रिकेट संघाकडून राजेंद्र मोटे, विनोद नरसाळे यांचा सन्मान

## राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल केला यथोचित सत्कार

गेवराई : प्रतिनिधी

झुंजार क्रिकेट संघाचे संस्थापक राजेंद्र मोटे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) च्या गेवराई तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच गेवराई तालुका दक्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद नरसाळे यांना 'आदर्श पत्रकार पुरस्कार' मिळाल्याबद्दल झुंजार क्रिकेट संघाच्या वतीने रविवारी सायंकाळी दोघांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

राजेंद्र मोटे यांनी झुंजार क्रिकेट संघाच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून क्रीडा क्षेत्रात योगदान देत युवकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. तसेच मागील अनेक वर्षांपासून राजकीय क्षेत्रात देखील त्यांचे कार्य उल्लेखनीय राहिले आहे. राजकारणाबरोरच त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) च्या गेवराई तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या निवडीबद्दल झुंजार क्रिकेट संघाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

त्याचप्रमाणे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत विविध समस्या



प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणारे गेवराई तालुका दक्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद नरसाळे यांना 'आदर्श पत्रकार पुरस्कार' मिळाल्याबद्दल त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी उपस्थितांनी राजेंद्र मोटे व विनोद नरसाळे यांचे अभिनंदन करून त्यांना सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या सत्कार सोहळ्यास झुंजार क्रिकेट संघाचे उमेश परदेशी, सुधीर जाधव, शामलाल नवले, राम जोशी, प्रशांत मस्के, विशाल मडकर, राहुल घाडगे, मंगेश खराद, अभिजीत कवडे, भारत मोटे, अविनाश मोटे, तात्यासाहेब भोसले, संतोष राठोड, गर्दे दादा, बाळाभाऊ पवार, संजय पवार, बसाया सर आदींची उपस्थिती होती.



# कळमअंबा येथील सैनिक किशोर वाघमारे भावपूर्ण निरोप,शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कळमआंबा येथील किशोर लक्ष्मण वाघमारे वय ३० वर्ष हे भारतीय सैन्य दलात राजस्थान येथील बिकानेर येथे ६७ मेडीयम रेजिमेंट पदावर कार्यरत होते. ते गावी सुट्टीवर आले होते.प्रवासा दरम्यान दि.१२ ऑगस्ट रोजी अपघात झाला.पुणे येथील रुग्णालयात उपचारा दरम्यान दि. २२ऑगस्ट रोजी निधन झाले.त्यांच्या पार्थिवा वर कळमआंबा या मूळगावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी

तहसीलदार भारत गंगावणे,युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे,सरपंच शशिकांत इंगळे,उप सरपंच दिगंबर वाघमारे पोलीस पाटील सतीश टोंपे,सामाजिक कार्यकर्ते व माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष अजिमोद्दीन शेख इनामदार,सचिव हनुमंत भोसले यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली.

पोलीसदल यांच्या कडून हवेत तीन फैरी झाडून सलामी देण्यात आली.त्यांच्या कुटुंबियांकडे तिरंगा ध्वज सुपूर्द करण्यात आला.भावपूर्ण वातावरणात माजी सैनिक कल्याण संघ बीडचे पदाधिकारी, पुणे येथून आलेले किशोर यांचे सहकारी सैनिक,परिसरातून आलेले देशप्रेमी नागरिक यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर सायंकाळी सात वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.अमर रहे अमर रहे किशोर वाघमारे अमर रहे च्या घोषणा देत गावातून अंत्ययात्रा काढण्यात आली.पत्नी आणि नातेवाईकांचा हुंदका दाटून आला होता.त्यांच्या पक्षात आई, वडील,भाऊ,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी असा मोठा परिवार आहे.




# राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ.सौ. कविताताई गित्ते – कराड यांचा सत्कार संपन्न

केज/प्रतिनिधी

साने गुरुजी निवासी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ.सौ. कविताताई गित्ते- कराड यांना केंद्र शासनाचा 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी आणि शैक्षणिक योगदानाची दखल घेऊन त्यांना हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला आहे.यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ,शाल व श्रीफळ देऊन त्यांचा भावूक सत्कार केला आणि पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी उपस्थित मान्यवरामध्ये

या सत्कार सोहळ्याला युवा नेते श्री. पशुपतीनाथ दांगट, मुन्ना आप्पा ठोंबरे, दिनकर राऊत, ताहेर भाई कुरेशी,विलासराव नेहरकर,इतापे सर, मनोज दांगट,पत्रकार मजहर शेख यांच्यासह अनेक संस्थाचालक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना डॉ.कविता गित्ते -कराड मॅडम यांनी,हा पुरस्कार केवळ माझा नसून साने गुरुजी विद्यालयाच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांचा, विद्यार्थ्यांचा आणि पालकांच्या विश्वासाचा सन्मान आहे,अशी भावना व्यक्त केली. उपस्थित सर्व मान्यवरांनी त्यांच्या या यशाचे कौतुक करत विद्यालयाचा आलेख असाच उंचावत राहो, अशा मनस्वी शुभेच्छा दिल्या.

# खलाटवाडीत ३८ व्या अखंड हरिनाम सप्ताहात काशिनाथ महाराजांचे प्रभावी कीर्तन

## संत वामनभाऊ महाराज व छत्रपती शिवरायांच्या विचारांचा जागर

आष्टी (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील खलाटवाडी येथे वै. गोविंद महाराज यांनी सुरू केलेला आणि अशोक महाराज शास्त्री गोविंदगड यांच्या मार्गदर्शनाखाली अखंडपणे सुरू असलेल्या ३८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सप्ताहाच्या सहाव्या दिवशी सकाळी ९ ते ११ या वेळेत काशिनाथ महाराज शास्त्री, गणेशगड यांची प्रभावी कीर्तनसेवा संपन्न झाली. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त, युवक, महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काशिनाथ महाराज शास्त्री यांनी आपल्या कीर्तन सेवेसाठी संत ज्ञानेश्वर महाराजांचा अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्हीं लोक... हा प्रसिद्ध अभंग घेतला. या अभंगाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण विश्व आनंदमय व्हावे, अशी भावना व्यक्त केली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेण्याची संत ज्ञानेश्वर महाराजांची उत्कट इच्छा या अभंगातून व्यक्त होते, असे त्यांनी स्पष्ट



केले.यावेळी बोलताना काशिनाथ महाराज शास्त्री यांनी ३८ वर्षांपूर्वी वै. गोविंद महाराज यांनी खलाटवाडी येथे हरिनाम सप्ताहाची मुहूर्तमेढ रोवली, त्या काळातील आठवणी सांगितल्या. सुरुवातीच्या काळात सप्ताहाला केवळ सुमारे १०० भाविक उपस्थित राहत असत; मात्र आजच्या काळात सप्ताहाने मोठे स्वरूप धारण केले असून भाविकांची प्रचंड उपस्थिती असते. त्यामुळे खलाटवाडी हे गाव आता केवळ एक छोटे खेडे राहिलेले नसून या धार्मिक सोहळ्यामुळे त्याला मोठ्या तीर्थक्षेत्रासारखे स्वरूप प्राप्त झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कीर्तनातून त्यांनी संत वामनभाऊ महाराजांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. संत वामनभाऊ महाराज जे बोलत होते, तसे प्रत्यक्षात घडत असे. त्यांच्या विचारांमध्ये समाजाला एकत्र आणण्याची ताकद होती. त्यामुळेच आज सर्व जाती-धर्मातील लोक संत वामनभाऊ महाराजांना श्रद्धेने मानतात, असे काशिनाथ महाराज शास्त्री यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा दाखला देत त्यांनी सामाजिक एकोप्याचा संदेशही दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही जातीवाद किंवा धर्मवाद केला नाही. विविध जाती-धर्मातील मावळ्यांना आणि समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे आजच्या समाजानेही छत्रपती शिवरायांच्या समतेच्या आणि सर्वसमावेशक विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

जाती-धर्मात भांडण करू नका, गुण्यागोविंदाने राहा, समाजात प्रेम, बंधुभाव आणि एकोपा निर्माण करा, असा प्रबोधनपर संदेश काशिनाथ महाराज शास्त्री यांनी आपल्या कीर्तनातून दिला. त्यांच्या ओघवत्या वाणीतील अध्यात्मिक निरूपणासोबतच सामाजिक प्रबोधनाच्या विचारांना उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दरम्यान, ३८ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या हरिनाम सप्ताहामुळे खलाटवाडी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, प्रवचन आणि हरिनामाच्या गजरामुळे पंचक्रोशीतील भाविकांची मोठी गर्दी होत आहे. सहाव्या दिवसाच्या कीर्तनसेवेला उपस्थित भाविकांनी मनोभावे सहभाग घेत काशिनाथ महाराज शास्त्री यांचे विचार श्रवण केले.

# इंदिरानगरसह वडारनगर रहिवाशांना पीटीआरसह घरकुले देण्याची मागणी

माजलगाव /प्रतिनिधी

इंदिरानगर आणि बंजारा नगरमधील वडार वस्तीतील रहिवाशांना त्यांच्या जागेचा पीटीआर देऊन प्रधानमंत्री आवास योजनेतून नवीन घरकुल मंजूर करावे, अशी मागणी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात भाजपाचे ज्ञानेश्वर मेंडके यांनी केला आहे. सन १९८९ मध्ये महसूल विभागाने या भागातील ओबीसी समुदायाच्या रहिवाशांना घरकुले दिली होती. आज ३७ वर्षांनंतर हीच घरे जीर्ण व धोकादायक अवस्थेत पोहोचली आहेत. अनेक घरांचे छप्पर खराब झाले असून, भिंतीदेखील कोसळत आहेत. पावसाळ्यात घरांमध्ये वास्तव्य करणे अत्यंत धोक्याचे ठरले आहे. अशा परिस्थीतीत रहीवाशांना तात्काळ पीटीआर मिळावा आणि प्रधानमंत्री आवास योजनेतून शासकीय मदतीतून नवी घरे मंजूर करण्यात यावीत. जीर्ण व असुरक्षित घरांचे सर्वेक्षण करून सर्व पात्र कुटुंबांना मदत करण्यात यावी. संबंधित विभागांना निर्देश देऊन त्वरित कारवाई करावी, असे मेंडके म्हणाले.

# डॉ.श्वेता शिवाजीराव कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त महादेववाडी शाळेत टिफिन्सचे वाटप

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कृतिशील सेवानिवृत्त संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव कोल्हे यांच्या कन्या तथा आष्टी तालुक्याच्या आरोग्य अधिकारी डॉ. श्वेता शिवाजीराव कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महादेववाडी येथे शालेय विद्यार्थ्यांना एकताळी टिफिन्सचे वाटप करण्यात आले.

वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या उपयोगी वस्तूंचे वाटप करून सामाजिक उपक्रमातून आनंद साजरा करण्यात आल्याने या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.डॉ. श्वेता शिवाजीराव कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे टिफिन्स देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याबरोबरच त्यांच्या शालेय जीवनात आवश्यक असणाऱ्या छोट्या-छोट्या गरजांचा विचार करून हा उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील विद्यार्थ्यांसोबत वाटून घेण्याची सकारात्मक भूमिका या उपक्रमातून दिसून आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महादेववाडी येथे आयोजित कार्यक्रमास दादेगावचे पोलीस पाटील संजय निंबाळकर, कृतिशील सेवानिवृत्त संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव कोल्हे तसेच शाळेचे मुख्याध्यापक भुकन सर उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना टिफिन्सचे वाटप करण्यात आले. टिफिन्स मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या दैनंदिन गरजांची जाणीव ठेवणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढविणे, या दृष्टीने अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे. ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयोगी वस्तूंचे वाटप केल्याने त्यांच्या शालेय जीवनात त्याचा निश्चितच उपयोग होणार आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबविण्याची ही संकल्पना




इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणारी आहे.

डॉ. श्वेता शिवाजीराव कोल्हे या आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत असून आरोग्य क्षेत्राशी संबंधित असलेल्या त्यांच्या भूमिकेला सामाजिक संवेदनशीलतेची जोड या उपक्रमातून मिळाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यपूर्ण आणि आनंदी शैक्षणिक जीवनासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना टिफिन्सचे वाटप करून त्यांच्यासोबत आनंदाचा क्षण साजरा करण्यात आल्याने महादेववाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला आहे. वाढदिवस साजरा करण्याची पारंपरिक पद्धत बाजूला ठेवून समाजातील गरजू व विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचे वाटप करण्याची भूमिका निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# केज येथील वेळूवन बुद्ध विहारासाठी प्रा. डॉ.बाबासाहेब हिरवे यांचे स्तुत्य धम्मदान!

केज/प्रतिनिधी

केज शहरातील वेळूवन बुद्ध विहारात होणाऱ्या विविध उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी आयु.प्रा. डॉ.बाबासाहेब हिरवे व त्यांच्या परिवाराने एक अहुजा लाऊड स्पीकर सेट किंमत ७७९५ रूपये धम्मदान म्हणून सप्रेम भेट दिला.प्रा.डॉ. बाबासाहेब हिरवे यांनी आपल्या घरी बोलावून ही सप्रेम भेट भारतीय बौद्ध महासभेचे शहर अध्यक्ष आयु.जयपाल मस्के यांच्याकडे सुपूर्द केली.या प्रसंगी आयु. नंदकुमार मस्के आणि आयु.हिरवे मॅडम यांची उपस्थिती होती.या धम्मदानामुळे बुद्ध विहारातील उपक्रमांना नक्कीच अधिक मदत होईल.या स्नेहयुक्त भेटी बद्दल आणि



योगदाना बद्दल जयपाल मस्के यांनी हिरवे परिवाराचे मनापासून आभार मानले आहेत.बुद्ध- धम्माच्या प्रचारासाठी आणि समाजाच्या विकासासाठी




समाजातील सर्व उच्च शिक्षित लोकांचा सहभाग झाल्यास सामाजिक पाठबळ लाभेल असे जयपाल मस्के यांनी सांगितले. वेळूवन बुध्द विहार भीमनगर केज येथे नियमितपणे रात्री आठ वाजता ग्रंथवाचन व धम्म प्रवचन मालिका सुरु आहे.बौद्ध उपासक -उपासिका यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रा.डॉ.बाबासाहेब हिरवे यांनी केले आहे.

सामाजिक दायित्व म्हणून ही फुल ना फुलाची पाकळी म्हणून हे धम्मदान दिले आहे.या मधुन शैक्षणिक,सामाजिक व धार्मिक चळवळ मजबूत होवुन आजच्या विद्यार्थी उद्याचा सक्षम, जागरूक व विज्ञाननिष्ठ नागरिक व्हावा अशी अपेक्षा

वृषाली हिरवे(आचार्य) यांनी यावेळी व्यक्त केली.



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील 'गायनिक' विभागातील सोनोग्राफी मशीन मागील चार वर्षांपासून बंद असल्याने तातडीने नवीन मशीन उपलब्ध करून सेवा सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.**

**याबाबत आज अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांना निवेदन देण्यात आले.**

**सोनोग्राफी अभावी गरोदर महिलांना बाहेर तपासणीसाठी जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच 'छ्खवउण' विभागाचे सुरक्षा ऑडिट करून उपकरणे, ऑक्सिजन, विद्युत व अग्निसुरक्षा, स्वच्छता, संसर्ग नियंत्रण आणि मनुष्यबळाची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली.**

**मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास अधिष्ठाता कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, नगरसेवक राजपाल जावळे, तानबा लांडगे यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

# बीड सरकारी दवाखान्याच्या न निषेधार्थ संध्या गायकवाडच्या न्यायासाठी वडवणीत रास्तारोको

## दोषी डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर फौजदारी दाखल करण्याचे तसेच सिझेरियन मातेच्या उपचाराच खर्च शासनाने करण्याची मागणी

लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे

वडवणी प्रतिनिधी-- वडवणी येथील संध्या सुरज गायकवाड यांच्या सिझर दरम्यान जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पोटातच ग्लोव्हज आणि टिश्यूपेपर विसरून राहिले होते. यामुळे या महिलेवर पुण्यातील ससून हॉस्पिटल येथे शस्त्रक्रिया करून ते साहित्य काढण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक आहे. याप्रकरणी संध्या गायकवाड यांना न्याय द्यावा आणि दोषी डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे या मातेच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या उपचाराचा पूर्ण खर्च शासनाने करावा यासह विविध मागण्यांसाठी सोमवारी (दि. २४) वडवणी येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे बीड-परळी महामार्ग दोन तास बंद राहिल्याने रस्त्यावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा



लागल्या होत्या यामुळे प्रवाशांना अडचणीचा सामना करावा लागला आहे.

बीड जिल्हा रुग्णालयात रुग्ण संख्या अफाट असून त्या तुलनेत मनुष्यबळ उपलब्ध नाही. अनेक जागा रिक्त असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यावर कामाचा ताण येत आहे. सध्या माता बालसंगोपन इमारतीची १०० बेडची क्षमता आहे. मात्र सध्या येथे तीन पट जास्त बेड आहेत. मागील २४ तासात ८६ सिझर झाले आहेत तर २९ नॉर्मल डिलिव्हरी झाली आहे. तर नवीन ३५ रुग्ण भरती झाले आहेत. यामुळे बेडची संख्या कमी पडत आहे. यामुळे लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून येथील रिक्त पदे भरण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी करण्यात येत आहे.

वडवणी येथील संध्या सुरज गायकवाड यांना प्रसुतीसाठी बीड येथे जिल्हा रुग्णालयात (दि. १) ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आले होते. याच दिवशी यांच्यावर सिझर करण्यात आले. यानंतर चार दिवसांनंतर सुट्टी देण्यात आली मात्र यानंतर सदर महिलेच्या पोटात दुखायला सुरुवात झाल्यानंतर दवाखान्यात दाखल केल्यानंतर हा गंभीर प्रकार समोर आला. या महिलेवर पुणे येथे ससून हॉस्पिटलमध्ये दाखल करून शस्त्रक्रिया करून पोटातील ग्लोव्हज आणि टिश्यू पेपर काढण्यात आले. मात्र तोपर्यंत याचे इन्फेक्शन वाढले असल्याने महिलेची प्रकृती चिंताजनक बनली आहे, तसेच अजूनही उपचार सुरू आहेत. याप्रकरणी कुटुंब व समाजबांधव आक्रमक झाले असून, आज सोमवारी मोठ्या प्रमाणात महिला, पुरुष यांनी रस्त्यावर उतरून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी केल्याने शहर दणाणून गेले होते. तर छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी बाबूराव पोटभरे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी आंदोलकांना मार्गदर्शन करीत जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर ताशेरे ओढले आहे. तर यावेळी दोषी डॉक्टर व संबंधित कर्मचाऱ्यांवर तत्काल फौजदारी गुन्हा दाखल करावा, डॉक्टरांच्या निष्काळजीपणाची चौकशी करून कठोर कारवाई करावी, संध्या गायकवाड यांच्या उपचाराचा खर्च शासनाने करण्यात यावे, सिव्हिल हॉस्पिटल, बीड येथील प्रशासनाने जाहीर माफी मागावी, रुग्ण सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करावी या मागण्यांचे निवेदन तहसिलदार यांच्यामार्फत देण्यात आले.



# मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षपदी श्री उमेश सांगळे यांची बहुमताने निवड

अंबाजोगाई- प्रतिनिधी:-

लातूर : मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षपदी प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर येथे कार्यरत असलेले श्री उमेश सांगळे यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे.

दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेची राज्यस्तरीय आमसभा महाराष्ट्र राज्य कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस श्री विश्वास काटकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

सदर आमसभेस महाराष्ट्र राज्यातील विविध प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये कार्यरत असलेले ठढज कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेमध्ये संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षपदासाठी निवड प्रक्रिया पार पडली.या निवड प्रक्रियेमध्ये उपस्थित प्रतिनिधी व सदस्यांनी बहुमताने श्री उमेश सांगळे यांच्यावर विश्वास व्यक्त करून त्यांची राज्याध्यक्षपदी निवड केली. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या अधिक प्रभावीपणे मांडल्या जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

श्री उमेश सांगळे यांच्या राज्याध्यक्षपदी झालेल्या निवडीबद्दल मोटार वाहन विभागातील अधिकारी व कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी तसेच विविध स्तरांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून,



# बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच च्या वतीने सुनीता नागरगोजे व ज्ञानेश्वर नागरगोजे यांचा भव्य सत्कार संपन्न

केज/प्रतिनिधी

बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच, महाराष्ट्र राज्यच्या बीड जिल्हा महिला अध्यक्षपदी सुनीता नागरगोजे यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. तसेच ज्ञानेश्वर नागरगोजे गायक यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे त्या बद्दल दोघांचाही शासकीय विश्रामगृह केज या ठिकाणी कला विश्व समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच सांस्कृतिक क्षेत्रात बहुजन समाजाचे विचार तळागाळात पोहोचवण्यासाठी आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही निवड करण्यात आल्याचे संघटनेतर्फे सांगण्यात आले.या निवडीबद्दल सुनीता नागरगोजे यांनी बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रसिद्ध गायक,गीतकार व संगीतकार श्री. दत्तात्रय शिंदे,उपाध्यक्ष तात्याराव झेंडे आणि कार्याध्यक्ष बाबासाहेब केदार सर यांचे विशेष आभार मानले आहेत.

आपल्या निवडीवर बोलताना सुनीता नागरगोजे म्हणाल्या की,वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन.बीड जिल्ह्यातील महिला कलावंतांना एकत्र करून त्यांच्या हक्क व व्यासपीठ मिळवून देणे आणि लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करणे हे माझे मुख्य उद्दिष्ट असेल.या निवडीबद्दल बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रांतील विजय मस्के राज्य उपाध्यक्ष, बाबासाहेब साहेबराव गायकवाड,जिल्हा सर चिटणीस विठ्ठल आनेराव जिल्हाध्यक्ष, महादेव लिंबाजी ठोंबरे,अर्जुन किसन शिंदे जिल्हा संरक्षक प्रमुख,कला विश्व समितीचे सर्व सोबत सदस्य यांच्यासह अनिल वैरागे यांनी या सत्काराचे आयोजन केले होते व इत्तर मान्यवरांकडून सुनीता नागरगोजे व गायक ज्ञानेश्वर नागरगोजे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वसुंधरा प्रशालेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

## आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचा मुंबईत सन्मान

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत सन २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत आष्टी तालुक्यातील वसुंधरा प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून आष्टीच्या शैक्षणिक गुणवत्तेचा राज्यस्तरावर ठसा उमटविला आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या अभिमानास्पद कामगिरीची दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे विशेष सत्कार करण्यात आला.



शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता चौथीमध्ये राज्यात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह इयत्ता पाचवी, सातवी आणि आठवीतील राज्य गुणवत्ता यादीत स्थान पटकाविणाऱ्या वसुंधरा प्रशालेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. राज्याच्या राजधानीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेला हा सन्मान विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालक, शिक्षक आणि वसुंधरा प्रशालेसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला.

वसुंधरा प्रशालेने गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. प्रशालेच्या आजवर तब्बल १ हजार ८७० विद्यार्थ्यांनी शासकीय शिष्यवृत्ती मिळविली असून, या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाकडून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आतापर्यंत तब्बल ४ कोटी ६ लाख ६४ हजार रुपये इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करण्याच्या प्रशालेच्या प्रयत्नांचे हे मोठे यश मानले जात आहे.

सन २०२५-२६ मध्येही वसुंधरा प्रशालेच्या तब्बल ८० विद्यार्थ्यांची राज्य गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. एकाच शैक्षणिक संस्थेतील एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळविणे ही आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे आष्टी तालुक्याचे नाव राज्याच्या शैक्षणिक नकाशावर अधोरेखित झाले आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या या विशेष सत्काराचे आयोजन आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे सन्माननीय सदस्य तथा मराठवाडा भूषण मा. श्री. सुरेश (आण्णा) धस यांच्या पुढाकारातून करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव व्हावा, त्यांच्या यशाला प्रोत्साहन मिळावे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती रोहिणी अशोक ढगे, श्री. गणेश देविदास हिंगणे तसेच वसुंधरा प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष श्री. मनोज धस उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचा विश्वास व पाठिंबा आणि संस्थेचे शैक्षणिक ध्येयधोरण यांचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

वसुंधरा प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश केवळ परीक्षेतील गुणांपुरते मर्यादित नसून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही गुणवत्तेची आणि स्पर्धात्मक क्षमतेची कमतरता नाही, हे सिद्ध करणारे आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे परिश्रम आणि पालकांचा पाठिंबा मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी राज्यस्तरावरही उत्तुंग यश संपादन करू शकतात, याचे वसुंधरा प्रशालेचे यश हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेल्या या सत्कारामुळे गुणवंत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक वृद्धिंगत झाला असून, भविष्यातही शैक्षणिक क्षेत्रात मोठी कामगिरी करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली आहे. वसुंधरा प्रशालेच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक लौकिकात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार २०२६ प्रदान....

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून २०२६ चा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार २३ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनी भव्य अशा समारंभात प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू मा. डॉ. विजय फुलारी हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. संजीव सोनवणे व सेवा निवृत्त सनदी अधिकारी श्री. भास्कर मुंडे हे उपस्थित होते. प्र. कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, डॉ. गजानन सानप, प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांची उपस्थिती होती. या पुरस्कारामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याला नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली असून, महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कारामुळे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्याची आणि प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांच्या नेतृत्वाची विद्यापीठ स्तरावर झालेली दखल ही मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळासाठी अभिमानाची बाब आहे, अशा भावना व्यक्त करत सर्व स्तरातून अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष मा.आ. प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस मा.आ. सतीशभाऊ चव्हाण, स्थानिक व्यवस्थापन समितीचे प्रमुख सदस्य मा. श्री. दत्तात्रयआबा पाटील, मा. श्री रमेशराव आडसकर, अधिसभा सदस्य डॉ. नरेंद्र काळे, मा. माणिकरावजी बावणे, श्री. वसंतराव मोरे, श्री. अमरभैय्या



देशमुख, मा.रणजितचाचा लोमटे यांनी अभिनंदन केले तसेच खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक फुलारी, मराठी विभाग प्रमुख प्रा. गौतम गायकवाड, जनविकास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुरलीधर लहाडे, ग्रंथपाल जयंत मोरे, वसुंधरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अर्जुन मोरे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अमोल गंगणे, डॉ. जगन्नाथ तुडमे, ज्येष्ठ कवी राजेंद्र रापतवार, प्राचार्य डॉ. हिरामण पुजदेकर, पत्रकार प्रशांत लाटकर, मराठा सेवा संघाच्यावतीने शिवश्री रामकिसन मस्के, गोविंद पतंगले, प्रवीण ठोंबरे, प्रशांत पवार, अंकुशराव ढोबळे व इंगळे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांच्या या सन्मानाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव केला.

आपल्या शैक्षणिक कार्यकर्दीमध्ये महाविद्यालयासाठी बहुमोल योगदान देणाऱ्या प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांचे एकूण ०९ पुस्तके प्रकाशित आहेत, युजीसी नवी दिल्ली आणि विद्यापीठाचे ०३ लघु संशोधन प्रकल्प पूर्ण आहेत. राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये ४० संशोधन निबंध प्रकाशित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनांतर्गत ०४ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. एकूण २८३ कार्यशाळा, चर्चासत्रे आणि परिषदांचे यशस्वी आयोजन संपन्न केले आहे.

मराठी साहित्य व समीक्षा, उच्च शिक्षण, संशोधन, गुणवत्ता आणि नॅक (छ--उ) इत्यादी विषयांवर महाविद्यालये आणि सार्वजनिक संस्थांमध्ये ५७ व्याख्याने दिली आहेत.

शैक्षणिक अंकेक्षक समिती स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत कार्य केले आहे. साहाय्यक प्राध्यापक, सह-प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड व कॅस प्रक्रियेसाठी मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी म्हणून कार्य. प्राचार्य आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या निवडीसाठी व्यवस्थापन तज्ज्ञ आणि कुलगुरूंचे प्रतिनिधी म्हणून पॅनेलवर काम केले. तर

मराठी विषय पदवी आणि पदव्युत्तर अध्यापनाचा प्रदीर्घ अनुभव आहे तसेच पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून १९ वर्षांचा प्रशासकीय अनुभव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सिनेट सदस्य,

सदस्य, विशेष आरक्षण कक्ष व

सदस्य, तक्रार निवारण समिती अशा विविध भूमिकावर काम करीत आहेत. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगात मूल्यमापनाचे कार्य, नॅक बँगलोरच्या पीअर टीमचे सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांनी यशस्वीरित्या कार्य केले आहे. अशा या सर्वांगीण शैक्षणिक कार्यासाठी त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कार प्राप्त आहेत. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय मानव कल्याण पुरस्कार, सी. सी. मुंबई, भारत विद्या शिरोमणी राष्ट्रीय पुरस्कार, नवी दिल्ली, जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार, महाराष्ट्र मीडिया, परभणी, दैनिक लोकमततर्फे बीड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय मानव कल्याण पुरस्कार, मुंबई, डी. लिट. पदवी, साऊथ अमेरिका युनिव्हर्सिटी, मॉन्टेव्हिडिओ, दक्षिण अमेरिका, महाराष्ट्र शासन करिअर कट्टाचा सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार २०२५ अशा पुरस्काराने प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांना गौरविण्यात आले आहे. या पुरस्कारामुळे माझी आणि महाविद्यालयाची जबाबदारी अधिक वाढली आहे, येणाऱ्या काळात महाविद्यालयाचे शैक्षणिक कार्य अधिक उंचावण्याचे प्रयत्न राहतील, संशोधन क्षेत्रामध्ये भरीव योगदान देण्यासाठी आमचे सर्वतोपरी प्रयत्न असतील, असे प्रतिपादन त्यांनी या पुरस्काराच्या अनुषंगाने केले



# रोटरी क्लब ऑफ केज ने केली सर्पविषयक जनजागृती

## पाच हजार विद्यार्थ्यांशी साधला संवाद

केज/प्रतिनिधी

केज येथील रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने सर्प विषयक जनजागृती करण्यासाठी अनेक शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.यावेळी रोटरी क्लब ऑफ केज चे अध्यक्ष असरार खुरेशी,सचिव हनुमंत भोसले,प्रोजेक्ट चेअरमन विकास मिरगणे,महेश जाजू व फिरोज पठाण यांची उपस्थिती होती.केज शहरातील शारदा इंग्लिश स्कुल व जीवन शिक्षण विद्यालय या शाळेत नागपंचमी व सापांचे महत्व याबद्दल विशेष मार्गदर्शन करण्यात आले.केज रोटरीच्या वतीने सचिव हनुमंत भोसले यांनी नागपंचमीचे निमित्ताने सापाचे सामाजिक महत्व,सापांचे प्रकार, सापाबद्दल घ्यावयाची काळजी,सर्पदंश झाल्यास करावयाचे उपचार इत्यादीबद्दल सविस्तर माहिती दिली.रोटरी अध्यक्ष असरार खुरेशी यांनी साप हा शेतकऱ्यांचा मित्र असून तो निसर्गाचा महत्वाचा घटक असल्याचे सांगितले.आपण सापाला मारू नये, सर्वच साप विषारी नसतात तसेच साप दिसल्यास सर्पमित्राला बोलावून सापाला सुरक्षित ठिकाणी सोडण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.केज रोटरी वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी अनेक कार्यक्रम राबविणार असल्याचे सांगितले.

प्रोजेक्ट चेअरमन विकास मिरगणे व महेश जाजू यांनीही सर्प जनजागृती मोहिमेच्या गरजेबद्दल माहिती देऊन शाळा, प्राचार्य व विद्यार्थ्यांचे विशेष आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ केजचे अनेक सदस्य व फिरोज पठाण यांनी सहकार्य केले.शारदा इंग्लिश स्कुलचे प्राचार्य सोनल मिश्रा व जीवन शिक्षण विद्यालयाचे प्राचार्य श्री.रमाकांत ढाकणे यांनी विशेष सहकार्य केले.या उपक्रमाचा विविध शाळेच्या साडेसहा हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.